सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा


छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २१६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दिल्ली बॉम्बस्फोटातील दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही: राजनाथ

नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर -दिल्ली बॉम्बस्फोटानंतर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी देशाला ठामपणे आश्वासन दिले की, या दुःखद घटनेसाठी जबाबदार असलेल्यांना न्याय दिला जाईल आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांना सोडले जाणार नाही. या घटनेत जीव गमावलेल्या सर्वांबद्दल मनापासून शोक व्यक्त करताना त्यांनी नागरिकांना आश्वासन दिले की, देशातील आघाडीच्या तपास संस्था या घटनेची त्वरित आणि सखोल चौकशी करत आहेत. तपासाचे निष्कर्ष लवकरच सार्वजनिक केले जातील.

मंगळवार नवी दिल्लीत मनोहर पर्रिकर इन्स्टिट्यूट फॉर डिफेन्स स्टडीज अँड नालिसिस (एमपी-आयडीएसए) द्वारे आयोजित दिल्ली संरक्षण संवादात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्घाटन भाषण देत होते. संवादाचा विषय संरक्षण क्षमता विकासासाठी नवीन युगातील तंत्रज्ञानाचा वापर होता. त्यांनी भारताला ग्राहकापासून तंत्रज्ञान निर्माता बनवण्यासाठी केवळ नवीन नवकल्पना स्वीकारण्याची गरज नाही तर स्वावलंबी बनवणाऱ्या प्रणाली आणि परिसंस्था तयार



करण्याची देखील गरज आहे यावर भर दिला. राजनाथ सिंह यांनी आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय), मशीन लर्निंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि झुंड तंत्रज्ञान यासारख्या क्रांतिकारी तंत्रज्ञानांना आत्मसात करून त्यांच्याशी जुळवून घेण्याची गरज यावर भर दिला.

ते म्हणाले की, प्रगतीची खरी परीक्षा साधने कशी कार्य करतात यावर आहे. ते म्हणाले की, तंत्रज्ञानाची शक्ती केवळ साधने किंवा अल्गोरिदमपुरती मर्यादित नाही; ती राष्ट्रीय सुरक्षेत योगदान देणाऱ्या प्रत्येक प्रक्रिया, प्रणाली आणि निर्णयाची पुनर्परिभाषा करते. तंत्रज्ञानाचा वापर केवळ नवीन साधने जोडण्याबद्दल नाही तर आपल्या संस्थांना अधिक चपळ, भविष्यसूचक आणि अनुकूलनीय बनवण्याबद्दल आहे आणि सतत शिकणारी, जलद प्रतिसाद देणारी आणि बदलाच्या गतीने विकसित होणारी संरक्षण रचना तयार करण्याबद्दल आहे.

संरक्षणमंत्र्यांनी यावर भर दिला की, हाय-स्पीड डेटा लिंक्स, एआय-संचालित अल्गोरिदम, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि स्वायत्त प्रणाली जलद अंतर्गत प्रक्रिया आणि त्यांना प्रभावीपणे आत्मसात करण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी मजबूत मानवी आणि संस्थात्मक क्षमताशिवाय फारसे साध्य होणार नाहीत. त्यांनी यावर भर दिला की संरक्षण तयारी सुरक्षित डेटा आर्किटेक्चर, एन्क्रिप्टेड नेटवर्क, स्वयंचलित देखभाल प्रणाली आणि इंटरऑपरेबल डेटाबेससह अदृश्य तंत्रज्ञानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. त्यांनी सांगितले की, तंत्रज्ञान नेतृत्व विशिष्ट प्रतिभा पूलमधून उद्भवत नाही, तर राष्ट्रीय परिसंस्थेतून उद्भवते.

## दिल्ली घटनेतील प्रत्येक दोषीला शोधून त्याला शिक्षा दिली जाईल -अमित शाह

नवी दिल्ली , ११ नोव्हेंबर : केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी आज दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर राष्ट्रीय राजधानी आणि देशातील इतर भागांतील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी या संदर्भात दोन वेगवेगळ्या बैठका घेऊन अधिकाऱ्यांना दोषींचा शोध घेण्याचे आदेश दिले आहेत.

अमित शाह यांनी सांगितले की, या घटनेतील प्रत्येक दोषीला शोधून त्याला शिक्षा दिली जाईल. सकाळ आणि दुपारच्या दोन्ही बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, या स्फोटामागे असलेल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे.

गृह मंत्रालयाने या स्फोटाच्या तपासाची जबाबदारी राष्ट्रीय तपास यंत्रणेला (एनआयए) सोपवली आहे. अमित शाह म्हणाले, वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या पुनरावलोकन बैठकीत दोषींचा शोध घेण्याचे आदेश दिले आहेत. या कृत्यात सहभागी सर्वांना कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल.

माहितीनुसार, अमित शाह यांनी मंगळवारी सकाळी पहिली बैठक घेतली, तर दुपारी दुसरी बैठक बोलावली. पहिल्या बैठकीला केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, गुप्तचर ब्युरोचे संचालक तपन डेका, दिल्ली पोलिस आयुक्त सतीश गोलचा, आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) महासंचालक सदानंद वसंत दाते उपस्थित होते.तर जम्मू-कश्मीरचे पोलिस महासंचालक नलिन प्रभात यांनी व्हर्च्युअल माध्यमातून बैठकीत सहभाग घेतला.

## थोडक्यात...

### दिल्ली बॉम्बस्फोट : ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाची मूक निदर्शने



ठाणे, ११ नोव्हेंबर - देश सुरक्षित हातात आहे, असे म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळातच देशात पुलवामा, पहलगाम आणि आता दिल्लीत दहशतवादी हल्ले झाले आहेत. हे केंद्र सरकारचे अपयश आहे, असा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या सूचनेनुसार तथा जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर मूक निदर्शने करण्यात आली. यावेळी स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना आदरांजली देखील अर्पण करण्यात आली. सोमवारी सायंकाळी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनसमोर एका कारमध्ये दहशतवाद्यांनी स्फोट घडविला. या स्फोटात अधिकृतरित्या नऊ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असून २२ जण जखमी झाले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काळ्या फिती लावून निदर्शने केली. दहशतवाद्यांचा बिमोड केलाच पाहिजे, राजधानीवरील हल्ला सहन करणार नाही, हल्ल्याला जबाबदार कोण? अशा आशयाचे फलक आंदोलकांनी हातात घेतले होते.

### सिंहस्थ कामाच्या उदघाटातून मुख्यमंत्री फोडणार प्रचाराचा नाराळ्

नाशिक, ११ नोव्हेंबर : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात कोटयावधीची कामे होणार असून गुरुवारी (दि.१३) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिक दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते मनपाकडून सुरु असणाऱ्या कोटयावधी कामाचे उदघाटन करुन आगामी महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचे नारळ फोडणार आहे. नाशिक महापालिका निवडणुकीसाठी भाजपने यापूवच शंभर प्लसचा नारा दिला आहे. त्यादुष्टीने भाजप काही महिन्यापासून तयारी करत आहेत. भाजपने पालिकेत सत्ता असताना कुठलीही कामे केली नसल्याचे आरोप विरोधी पक्षाकडून सातत्याने केले जातात. मात्र आता सिंहस्थ कामाच्या माध्यमातून होणार विकास कामांच्या शुभारंभाद्वारे भाजप एकप्रकारे विरोधकांना उत्तर दणार आहेत. त्यामुळेच गुरुवारी मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते हजारो कोटींच्या प्रकल्पाचे उदघाटन होत असताना याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. यंदा नाशिक-त्र्यंबकश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तब्बल २५ हजार कोटींचा आराखडा मंजूर केल्याने नाशिकमधील हजारो कोटींची कामे यानिमित्ताने होणार आहे. याच निधीतून सिंहस्थ व नाशिकच्या दुष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रकल्पाचे उदघाटन मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री यांच्याकडून सदर विकास कामांद्वारे विरोधकांचा समाचार घेण्याची शक्यता आहेत. रामकाल पथची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी केंद्र वर राज्य सरकार मिळून पंचवटीत रामकाल पथ हा अध्यात्मिक कॉरीडोर साकारणार आहे.

### पाचव्या वित्त आयोगाला मुदतवाढ!

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (मंगळवार) राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत एकूण ५ महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले असून, यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अंमलबजावणीच्या कालावधीत वाढ करण्याचा आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे. यामुळे स्थानिक संस्थांना नियोजन करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील या कॅबिनेट बैठकीत केवळ वित्त आयोगच नव्हे, तर इतर विभागांसाठीही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत सहकारी विभाग, विधि व न्याय विभाग, वित्त विभाग, जलसंपदा विभाग (या विभागासाठी २ निर्णय) असे एकूण ५ महत्त्वाचे निर्णय या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले. हे निर्णय राज्याच्या प्रशासन आणि धोरणात्मक कामांसाठी महत्त्वाचे मानले जात आहेत.

आजच्या बैठकीतील मंत्रिमंडळ निर्णय

(सहकार विभाग) : नाशिक, नागपूर व धाराशिव या जिल्हा मध्यवती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल

(विधि व न्याय विभाग) : न्यायालयीन संकुले तसेच न्यायाधिशांची निवासस्थाने यांच्या सुरक्षेत वाढ.

## दिल्ली बॉम्बस्फोटातील दोषींना सोडले जाणार नाही, आम्ही घटनेच्या तळाशी जाऊ - पंतप्रधान



नवी दिल्ली , ११ नोव्हेंबर : भुटानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर गेलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीमध्ये झालेल्या कार स्फोटाबद्दल दुःख व्यक्त केले असून या घटनेसाठी जबाबदार असणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. सोमवारी संध्याकाळी दिल्लीमध्ये बॉम्बस्फोट झाला आणि ठरलेल्या कार्यक्रमानुसार पंतप्रधान मोदी मंगळवारी सकाळी भुटानला पोहोचले. तिथेच त्यांनी या घटनेवर आपले वक्तव्य दिले.

थिम्फूमध्ये आयोजित एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले,आज मी येथे अतिशय जड अंतःकरणाने आलो आहे. काल संध्याकाळी दिल्लीमध्ये घडलेल्या भीषण घटनेने सर्वांच्या मनाला वेदना दिल्या आहेत. मी पीडित कुटुंबियांच्या वेदना समजू शकतो. आज संपूर्ण देश त्यांच्या सोबत उभा आहे. मी काल रात्रीभर या घटनेच्या तपासात गुंतलेल्या सर्व संस्थांशी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्कात होतो. आमच्या तपास यंत्रणा या षड्यंत्राच्या मुळापर्यंत पोहोचतील. या स्फोटामागे असलेल्या षड्यंत्रकर्त्यांना अजिबात सोडले जाणार नाही.सोमवारी संध्याकाळी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ एका कारमध्ये झालेल्या स्फोटात ११ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक जखमी आहेत. तपास यंत्रणा या स्फोटाच्या चौकशीत व्यस्त आहेत.

## चंद्रशेखर बावनकुळे भाजपाचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी

### ५१ टक्के मते घेऊन महायुतीचा विजय निश्चित, तीन पक्षांतील तीन मंत्र्यांची समन्वय समिती

#### प्रत्येक जिल्ह्यात निवडणूक प्रभारी

मुंबई दि. ११ : महसूलमंत्री व माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नावाची घोषणा केली.

बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात महायुतीच्या माध्यमातून ५१ टक्के मते घेऊन दोन-तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू. राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व जिल्हा परिषद आणि नगरपालिका, नगरपंचायती यामध्ये भाजप-महायुती ही प्रचंड बहुमताने विजयी होईल असा मला विश्वास आहे.

मंगळवारी सकाळी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजपाच्या महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या जिल्हा प्रभारींची बैठक झाली. या बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राज्यातील विविध भागातील संघटन मंत्री, महामंत्री, मंत्रीमंडळातील मंत्री उपस्थित होते.

तब्बल तीन तास राज्यातील सर्व निवडणुकांचे विभागनिहाय सादरीकरण बैठकीत करण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रभाऱ्यांना जास्तीत जास्त महायुतीवर भर देण्याच्या, मित्रपक्षांवर टीका-टिप्पणी न करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यानंतर प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपाचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून घोषणा केली.

बावनकुळे म्हणजे की, महायुतीत समन्वय टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील. या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती असेल. यामध्ये एक भाजप, एक शिवसेना आणि एक राष्ट्रवादी असे तीन मंत्री समन्वयक म्हणून काम करणार आहेत. महायुतीतील मित्रपक्षांमध्ये कुठेही मतभेद आणि मनभेद होणार नाही याची काळजी भाजप घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बुधवारी जालना येथे जाहीर सभा

जालना, ११ नोव्हेंबर : जालना येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आवाहन केले आहे. जालना शहरात १२ नोव्हेंबर २०२५ (बुधवार) रोजी दुपारी ३.३० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मामा चौक, जालना येथे कार्यकर्ते मेळावा व भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

या सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे.

सभेच्या पूर्वतयारीसंदर्भात भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात जिल्ह्यातील शिवसेना, युवासेना व संलग्न संघटनांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार खोतकर म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या व आगामी विकासकामांची माहिती या सभेत दिली जाणार आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहावे.

या बैठकीस आमदार हिकमतदादा उढाण, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए.जे. पाटील बोराडे, सहसंपर्कप्रमुख सुनील किनगावकर, लाला तांबोळी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, सविता केंवडे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, ॲड. भास्कर मगरे, जावेदभाई, भाऊसाहेब पाऊलबुदे, गणेशराव राऊत, भगवान अंभोरे आदींसह उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विभागप्रमुख, आजी-माजी सदस्य, नगरसेवक व मोठ्या संख्येने शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते.

सभेच्या यशासाठी शिवसेना युवासेना पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने तयारी करत असून, मामा चौक परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे.

सभेच्या यशासाठी सर्वांनी मनापासून प्रयत्न करावेत, असे आवाहनही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले.

## दिल्लीच्या स्फोटानंतर छत्रपती संभाजीनगर शहरात हाय अलर्ट जारी

छत्रपती संभाजीनगर, ११ नोव्हेंबर : दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटानंतर छत्रपती संभाजीनगर शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, शहरातील रेल्वे स्थानकासारख्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे.

अजिंठा, एलोरा यांसारखी जागतिक पर्यटन स्थळे आणि उत्तर व दक्षिण भारताला जोडणारे रेल्वे जंक्शन असल्यामुळे शहरात विशेष खबरदारी घेतली जात आहे. वृत्तानुसार, 'हाय अलर्ट ज्या मोठमोठ्या शहरांना देण्यात आले आहे. तसंच अलर्ट छत्रपती संभाजीनगर मध्ये सुद्धा पोलीस आणि तपास यंत्रणेनं दिलेलं आहे.' रेल्वे स्थानकावर पोलीस पथके आणि डॉग स्क्वॉड तैनात करण्यात आले असून, येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाची आणि त्यांच्या सामानाची कसून तपासणी केली जात आहे. संपूर्ण परिसरात पोलीस करडी नजर ठेवून आहेत.

## छत्रपती संभाजी नगर मनपा आरक्षण जाहीर, ५७ जागा महिलांसाठी राखीव

छत्रपती संभाजीनगर, ११ नोव्हेंबर : आगामी महानगरपालिका निवडणूक २०२५ साठी बहुचर्चित छत्रपती संभाजीनगरमधील आरक्षण अखेर जाहीर झाले आहे. एकूण ११५ प्रभागांसाठी आरक्षण तक्ता निश्चित क्ररण्यात आला असून, ५७ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांमध्ये आरक्षणाचे संतुलन ठेवण्यात आले आहे. यंदाच्या निवडणुकीत महिलांना मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळणार असून, सुमारे अर्ध्या जागा महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत.

एकूण ११५ प्रभागांपैकी ३१ जागा सर्वसाधारण पुरुषांसाठी, ३० सर्वसाधारण महिलांसाठी, ११ अनुसूचित जाती पुरुष, ११ अनुसूचित जाती महिला, १ अनुसूचित जमाती पुरुष, १अनुसूचित जमाती महिला, १५ ओबीसी पुरुष आणि १५ ओबीसी महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. महिला आरक्षणाची ही टक्केवारी मागील निवडणुकीपेक्षा वाढलेली आहे.

शहरातील प्रमुख पक्षांसमोर उमेदवार निवडीत नवे आव्हान उभे राहिले आहे. शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, काँग्रेस आणि मनसे, या सर्व पक्षांना आरक्षणाच्या नव्या गणितानुसार उमेदवारांची पुनर्रचना करावी लागणार आहे. गेल्या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये पुरुष नेत्यांनी सलग विजय मिळवले होते, मात्र आता त्या जागा महिलांसाठी राखीव झाल्याने जुनी समीकरणे बदलणार आहेत. काही ठिकाणी प्रस्थापित नेत्यांना आपल्या पत्नी, भगिनी किंवा कार्यकर्त्यांना पुढे करावे लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नागपूर मनपाची आरक्षण सोडत जाहीर; नव्या व्यवस्थेत ७६ नगरसेविका, ७५ नगरसेवक राहणार

नागपूर, ११ नोव्हेंबर : नागपूर महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी आरक्षण सोडत आज (११ नोव्हेंबर) सकाळी कविवर्य सुरेश भट सभागृहात जाहीर करण्यात आली. या सोडतीनंतर महापालिकेतील एकूण १५१ जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठरल्या असून, यंदा ७६ नगरसेविका आणि ७५ नगरसेवक असे प्रतिनिधित्व असणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर इच्छुक उमेदवार आणि माजी नगरसेवकांचे लक्ष या आरक्षण सोडतीकडे लागले होते. अखेर आज जाहीर झालेल्या सोडतीनंतर राजकीय पक्षांच्या गणितात मोठे बदल घडणार आहेत.

प्रभागनिहाय आरक्षण तपशील

महापालिकेत एकूण ३८ प्रभाग आहेत. त्यापैकी ३७ प्रभागांमध्ये प्रत्येकी चार सदस्य, तर ३८ क्रमांकाच्या प्रभागात तीन सदस्य असतील.

एकूण १५१ जागांपैकी प्रवर्गनिहाय विभागणी पुढीलप्रमाणे आहे -

सर्वसाधारण प्रवर्ग : ६९

इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) : ४०

अनुसूचित जाती (डउ) : ३०

अनुसूचित जमाती (डढ) : १२

अनुसूचित जातींसाठी राखीव प्रभागअनुसूचित जातींसाठी राखीव ३० प्रभागांपैकी १५ महिला प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत.

महिला राखीव प्रभाग क्रमांक -

२ अ, ४ अ, ५ अ, ६ अ, ७ अ, १० अ, १२ अ, १४ अ, १७ अ, २४ अ, २५ अ, २९ अ, ३० अ, ३२ अ, ३७ अ

अनुसूचित जमातींसाठी राखीव प्रभाग

अनुसूचित जमातींसाठी राखीव एकूण १२ प्रभागांपैकी ६ प्रभाग महिला राखीव ठरले आहेत.

महिला राखीव प्रभाग क्रमांक -

८ अ, १३ ब, १४ ब, २० ब, २१ अ, ३४ ब

राजकीय समीकरणात बदलाची शक्यता

आरक्षण सोडतीनंतर राजकीय पक्षांकडून उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. काही प्रभागांमध्ये आरक्षणात झालेल्या बदलांमुळे विद्यमान नगरसेवकांच्या जागांवर परिणाम होऊ शकतो.


राजकीय तज्ज्ञांच्या मते, या सोडतीमुळे नागपूरच्या प्रभागरचनेत नवे समीकरण तयार होणार असून, महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याने महानगरपालिकेतील नेतृत्वाचा चेहरामोहरा अधिक समतोल व प्रगतिशील होण्याची शक्यता आहे.

## डॉ. उमरने घाईगडबडीत केला बॉम्बस्फोट; फरीदाबादच्या छापेमारीमुळे घाबरला होता दहशतवादी

नवी दिल्ली, ११ नोव्हेंबर : दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी संध्याकाळी झालेल्या भीषण कार स्फोटाच्या तपासात नवे धागेदोरे समोर आले आहेत. या स्फोटात वापरण्यात आलेली हुंडई आय-२० कार फरीदाबाद दहशतवादी मॉड्यूलशी थेट जोडलेली असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या कारचा चालक डॉ. उमर मोहम्मद नबी हा पुलवामाचा रहिवासी असून, तोच या घटनेतील संशयित आहे.

फरीदाबाद छापेमारीमुळे घाबरला होता उमर

गुप्तचर संस्थांच्या माहितीनुसार, फरीदाबादमधील दहशतवादी मॉड्यूलवर छापा टाकल्यानंतर उमर मोहम्मद अत्यंत घाबरला होता. आपल्या इतर सहकाऱ्यांच्या अटकेनंतर पकडले जाण्याच्या भीतीने त्याने घाईगडबडीत हा आत्मघाती स्फोट घडवून आणल्याची शक्यता तपासात वर्तवली जात आहे. कारमध्ये इम्प्रोसिव्ह एक्स्प्लोसिव्ह डिव्हाईस (आयईडी) बसवण्यात आले होते. या स्फोटात १० जणांचा मृत्यू झाला असून, २४ जखमी झाले आहेत. अनेक वाहने आणि जवळील मालमत्ता जळून खाक झाली.



फरीदाबाद मॉड्यूलशी थेट संबंध

फरीदाबादमध्ये काही दिवसांपूर्वी पोलिसांनी केलेल्या कारवाईत २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. त्यात अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट आणि सल्फरचा समावेश होता. त्याच मॉड्यूलशी डॉ. उमर मोहम्मदचा संबंध असल्याचे समोर आले आहे. तपासात असेही उघड झाले की, उमर हा जैश-ए-मोहम्मद या संघटनेशी संबंधित होता. त्याचा सहकारी आणि कारचा मालक तारिक याला अटक करण्यात आली आहे. त्यानेच उमरला स्फोटासाठी ही आय-२० कार दिली होती.

डीएनए चाचणीद्वारे पुष्टी होणार

स्फोटानंतर घटनास्थळी सापडलेल्या मृतदेहाचा डीएनए नमुना दिल्ली पोलिसांकडून तपासला जाणार आहे, ज्यातून हे निश्चित केले जाईल की तो मृतदेह डॉ. उमर मोहम्मदचाच आहे की नाही. कार चालवणाऱ्या व्यक्तीचे काही सीसीटीव्ही फुटेजेस देखील समोर आले असून, त्यात मुखवटा घातलेला व्यक्ती कार चालवत असल्याचे दिसते.

राष्ट्रीय राजधानीत सतर्कता

स्फोटानंतर दिल्लीतील सर्व सीमांवर पोलिसांनी तपासणी नाके उभारले असून, प्रत्येक वाहनाची काटेकोर तपासणी सुरू आहे. लाल किल्ला परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासाठी स्वतंत्र टीम्स कार्यरत आहेत. तपासात असेही स्पष्ट झाले आहे की, स्फोटापूर्वी ती कार जवळपास ३ तास पार्किंगमध्ये उभी होती. प्राथमिक तपासात हे स्पष्ट होते की दिल्लीतील स्फोट आणि फरीदाबाद मॉड्यूल हे एकमेकांशी जोडलेले आहेत. स्फोटात वापरण्यात आलेली सामग्री अमोनियम नायट्रेट आणि इंधन तेलाचे मिश्रण असावे असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.



## निसर्गभान

# अनोखे समुद्रप्रहरी



ते बघा लाईमस्टोनचे डोंगर! आमचा गाईड म्हणाला. निळसर हिरवट समुद्राचं पाणी आणि त्यात उंच उभे राहून आसमंत निरखणारी शिखरे अतिशय निराळं लक्षवेधक दृश्य! व्हिएतनामची राजधानी हॅनॉयवरून सकाळी 'हा लाँग बे' कडे निघालो. गावातून बाहेर पडल्यानंतर सुंदर चार पदरी रस्त्याच्या दुतर्फा हिरव्यागार केळीच्या बागा आणि त्यातच दुमजली कौलारू किंवा उतरत्या छपरांची टुमदार घरे! दर दहा-पंधरा किमीवर छोटीमोठी नदी, तिचं झुळझुळतं पाणी, काठावर नारळाच्या डुलणाऱ्या झावळ्या आणि भाताची शेती काही ठिकाणी कापणी झालेली, तर कुठे पिकं कापणीवर...! त्यामुळे पिवळसर, तर कुठे हिरवीगार शेतं! या सर्वांमधून हलकेच डोकं वर काढणारी टुमदार घरांची छोटी गावं. मनाला ताजंतवानं करणाऱ्या या आसमंतात गुंतलो असताना गाईडने ते डोंगर दाखवले... आणि काही मिनिटांतच आम्ही 'हा लाँग बे'ला पोहोचलो.

एका छोट्या बोटीतून आम्ही निघालो. फिकट हिरवट निळसर समुद्राचं पाणी संथ पाण्यावर हलक्या लाटा... बोट मात्र आवाज आणि पाणी फेसाळ करीत निघाली. पाच मिनिटांत वेगळ्याच विश्वात पोचलो. समुद्रात आजुबाजूला थोड्या-थोड्या अंतराने विविध आकारांचे डोंगर स्वागताला उभे! निरनिराळ्या कोनात रचलेल्या दगडांच्या चळतीचे उंच डोंगर, त्यातील फटींमध्ये उगवलेली हिरवी झाडं...! त्या बोटीने आम्ही आमच्या ओळखीच्या जगाला कधीच मागे टाकले आणि खोल समुद्रात उभ्या असलेल्या एका मोठ्या बोटीत बसलो. नावाड्याने छोटी बोट मोठ्या बोटीला बांधली. निसर्गाचा अप्रतिम नजारा बघत समुद्रातल्या डोंगरांमधून वळणं घेत बोट जात होती.

व्हिएतनाममधील एक प्रमुख आकर्षण 'हा लाँग बे'ला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. परदेशी आक्रमणकर्त्यांशी लढून व्हिएतनामचे संरक्षण करण्यासाठी स्वर्गातून एक ड्रॅगन खाली उतरला. ड्रॅगनने समुद्रात उडी मारल्यावर त्याच्या चोचीच्या आणि पंखांच्या धक्क्यांमुळे हजारो चुनखडीचे पर्वत आणि बेटे तयार झाली. या आख्यायिकेमुळे या खाडीचे नाव व्हिएतनामी भाषेत 'हा लाँग' म्हणजे 'उतरणारा ड्रॅगन'!

कार्स्ट म्हणजे चुनखडी किंवा जिप्समसारख्या पाण्यात विरघळणाऱ्या खडकांपासून बनलेला भूप्रदेश...! चुनखडी म्हणजे लाईमस्टोनचे हे खडक पाण्यातील कार्बन डाय-ऑक्साईडमुळे पाण्यात विरघळून जमिनीखाली गुहा, भुयारी प्रवाह, मोठे खड्डे आणि झरे तयार होतात. 'हा लाँग बे' त्याच्या हिरवट समुद्री पाण्यातून आपल्याकडे कुतुहलाने बघत वर येणाऱ्या हजारो उंच चुनखडीच्या कार्स्ट बेटांसाठी ओळखले जाते. डोक्यावर विस्तिर्ण निळे आकाश आणि खाली समुद्राच्या चमचमत्या पाण्यातून वर येणारे हे अधूनमधून हिरवळीने नटलेले कार्स्ट्स... नयनरम्य दृश्य!

● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

संध्याकाळी आमच्यापैकी दोघे स्वतः कयाकिंग करीत, तर बाकीचे वल्हवणाऱ्या छोट्या नावांमधून निघालो. शांत निवांत निसर्ग असल्यामुळे समुद्रातून छोट्या होडीतून जातानाही भीती वाटली नाही. जरा पुढे आल्यावर तर आश्चर्याने डोळेच विस्फारले... समोर डोंगरात एक मोठा सात फूट उंच तर पंचवीस-तीस फूट रुंद आरपार बोगदा! बोगद्यातून जाताना त्या विस्तीर्ण छतावर, चुनखडी पाण्यात विरघळून थेंब-थेंब टपकल्यामुळे तयार झालेली, लटकणारी वेगवेगळ्या आकारांची मोठाली झुंबरं तर कुठेकुठे मोठाले खवले! त्या छताखालून नाव गेली तेव्हा निसर्गाचे हे विस्मयकारक रूप डोळ्यात साठवले.

ही आम्ही बघितलेली एक डोंगराच्या खालून जाणारी अद्‌भुत-रम्य पोकळी! पण इथल्या प्रत्येक डोंगरांमध्ये अशा अनेक गुहा आणि पोकळ्या तयार झालेल्या आहेत. 'हा लाँग बे' मधील 'कॅट बा' बेट सर्वांत मोठे बेट आहे. वर्षभर पाऊस असल्याने, घनदाट सदाहरित झाडांनी आच्छादलेले हे बेट राष्ट्रीय उद्यानाचा भाग आहे. पांढऱ्या डोक्याची लंगूर माकडे इथे बघायला मिळाली. माकडांची ही प्रजाती आता धोक्यात आहे. या बेटावरील एका मोठ्या गुहेत अमेरिकन युद्धादरम्यान सैनिकांना आश्रय देण्यात आला होता. म्हणून तिला 'हॉस्पिटल केव्ह' म्हणतात. बाहेरून हिरवाईत लपलेल्या या गुहेत शिरण्यासाठी एक उंच सरळ वर नेणारी लोखंडी शिडी आहे. या गुहेत सैनिकांसाठी एक परिपूर्ण इस्पितळ बनविले होते. व्हिएतनामी लोकांनी रशियाच्या मदतीने अमेरिकेशी ज्या पद्धतीने वीस वर्षे लढाईला तोंड दिले ते अचंबित करतं.

**'हा लाँग बे' म्हणजे -**
**हिरवे नक्षीदार जॅकेट घालून**
**उभे डोंगर-प्रहरी दिमाखात**
**हरवत कधी धुक्यात तर**
**कधी रिमझिम पावसात!**
**खडक न् हिरवाई सवे पाण्याचे**
**अविरत देखणे नर्तन**
**समुद्राचे आकाशीच्या**
**निळाईशी मनोहारी मिलन!**

## खाद्य संस्कृती

# भरड्याचा गोळा भात

भारतात अनेक खाद्यपदार्थांची विविधता दिसून येते. प्रांताप्रमाणे तसेच तिथल्या हवामानाप्रमाणे दर दोन-तीन वेशी ओलांडल्या की नवीन चालीरिती दिसतात. विविध प्रदेशात भ्रमंती करताना तिथल्या पदार्थांचा आस्वाद घेतलाच पाहिजे.

विदर्भात एक चविष्ट आणि पौष्टी पारंपरिक जेवणातला पदार्थ म्हणजे गोळा भात किंवा गोळा तांदूळ. तसे भाताचे अनेक प्रकार उत्तर, दक्षिणेतही प्रचलित आहेत. महाराष्टात पण भाताचे काही भन्नाट प्रकार आहेत. महाराष्टीयन थाळी ही आंबट, गोड, तिखट, तुरट आणि गोड या सर्व रसांनी परिपूर्ण असते. त्यातलाच एक प्रकार म्हणजे गोळा तांदूळ. साधारण देवीच्या नवरात्रात काही लोकांकडे धान्य फराळ असतो, तेव्हा केल्या जातो. म्हणूनच याला पूर्णान्न म्हणता येईल. इतर वेळीही आवडीचा पदार्थ ठरतो. हा प्रकार जाणीवपूर्वक करावा लागतो. अगदी पुलाव, बिर्याणीचा तांदूळ याला लागत नाही. घरी रोजच्याच वापरातला आंबेमोहर, श्रीराम, कोलम वगैरे कोणताही तांदूळ घ्यावा.

भरड्यासाठी हरभरा, मूग, उडीद या डाळी भिजवून वाटून घ्याव्यात, अन्यथा कोरड्या मिक्स डाळींचा जाडसर भरडा पण वाटून ठेवाव्यात आणि आयत्या वेळी भरडा भिजवावा. या भरड्यात चवीनुसार आलं, लसूण, धने जिरे पूड, हळद, तिखट मीठ आणि ३-४ चमचे तेल घालून एकत्र करायचे. जरुरीपुरते पाणी आवश्यक वाटल्यास घालावे आणि छोटे छोटे गोळे करून ठेवावेत.

● स्नेहल खंडागळे
९९७०१३७९७७

कुकरमध्ये झाकण न लावता किंवा मोठ्या गंजात तेल, जिरे, मोहरी हळद घालून धुतलेले तांदूळ परतायचे. त्यात आवश्यक तेवढे पाणी घालून भात शिजत आला की भरड्याचे गोळे घालावेत आणि शिजू द्यावे. झाकणावर थोडे पाणी घालून शिजण्यास ठेवावे. गोळे छान भातात मूरतात. भात शिजत असताना गोळेभाताचा मिश्र सुगंध घरभर दरवळतो.

हा भात चिकट होता कामा नये. भाताला किंचित पाणी कमी घालावे म्हणजे शीत अन् शीत मोकळे होते. व्यवस्थित शिजल्यावर हा गोळा तांदूळ प्लेटमध्ये काढावा आणि त्यावर भरपूर मोहरी आणि हिंग घातलेली चूर्र फोडणी घ्यावी. चिंचेचे सार किंवा आमसुलाचे सार, टोमॅटोचे सार, ताक यामध्ये कालवून याचा एकत्रितपणे आस्वाद घ्यावा. पोटाबरोबरच मनालाही तृप्ती येते.

# संस्कृती

माझ्या देशातील संस्कृती
मला बरंच काही शिकवते
कुठे बोलतात बोलीभाषा गोड
त्याकडे बघतच रहावे वाटते
खाद्यसंस्कृती ही तेवढीच छान
कुठे मिळतात रानभाज्या, कंदमुळे
वेषभूषा ही तेवढीच देखणी
संस्कृती टिकून आहे गावखेड्यामुळे
ढोल, तासे नंगारे वाजवतात
अन् केसांना मोरपीस खोसतात
नृत्य करतात जणू बघण्यासारखे
जुन्या आठवणींना उजाळा देतात
डोंगर दऱ्यात राहणारे लोक
आपली संस्कृती विसरत नाही
लग्न असो वा कार्यक्रम कोणते
आपला रितीरिवाज सोडत नाही
माझ्या देशाची संस्कृती जगावेगळी
सदैव ती माझ्यासाठी मोलाची आहे
शिकवण, संस्कार देते मजला
तिच्याने मलाही मार्गदर्शन
मिळत आहे

● संगीता ठलाल/७८२१८१६४८५

● संयोजक: संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२ ●

## आठवण

# अण्णाजींची बंडी

ती बंडी! ती केवळ कापड नव्हे, तर माझ्या स्मृतीपटलावर कोरलेला एक जिवंत दस्तावेज आहे, ज्याला विस्मृतीत ढकलणे शक्यच नाही. 'अण्णाजींची बंडी' ही माझ्यासाठी स्व-भूषेची अमूल्य ठेव आहे. स्मृतींच्या धाग्यांत विणलेले 'स्वत्व' आहे.

ती बंडी म्हणजे शुद्ध सुती कापसाच्या निष्ठावान धाग्यांनी विणलेली एक शांत कलाकृती होती. शहरातील दुकानांच्या झगमगाटापेक्षा, गावच्या शिंप्याच्या हातकलेची साधी, पण कसदार साक्ष तिच्यात होती. तिच्या प्रत्येक शिवणात अण्णाजींचा सरळ आणि स्पष्ट स्वभाव प्रतिबिंबित होत असे.



● अमोल तपासे
९९६०६७३७८९

तिच्या बाह्या हाताच्या अर्ध्यावरच थांबलेल्या असायच्या. त्या अर्ध्या बाह्या म्हणजे सज्जतेचे आणि कार्यासाठी तत्पर राहण्याचे प्रतीक होते-मग ते शेतीचे काम असो, समाजाचे प्रश्न असोत, की कुटुंबाची जबाबदारी. अण्णाजींची ही वृत्ती त्या सदैव सिद्ध बाह्यांतून व्यक्त होत असे.


बंडीच्या पोटावरचा तो 'एल' आकाराचा खिसा! तो नुसता खिसा नव्हता, तो अण्णांच्या विश्वासाचा एक सुरक्षित तहखाना होता. तो अदृश्य खिसा म्हणजे अण्णाजींची जीवन जगण्याची कूटनीती होती. बाहेरील जगाला आपले वैभव न दाखवता, आपले गुपित सुरक्षित ठेवण्याची कला त्यांनी त्या खिशाच्या डिझाईनमधून शिकवली. त्या खिशाचे डिझाईन असे होते की, चोराची करडी नजर त्या गुप्त ठिकाणी पोहोचू शकत नव्हती. तो खिसा म्हणजे काळजी आणि दूरदृष्टीचे प्रतीक होता. त्यात ठेवलेला पैसा हा केवळ चलन नव्हते, तर संकटकाळासाठी जपलेला 'आधार' होता, ज्याला कोणीही चोर कापू शकणार नव्हता. त्या खिशातील मुख्य वस्तू म्हणजे बारीक चिक्कण भरडा फोडलेली सुपारी. ही सुपारी म्हणजे केवळ मुखशुद्धीचे साधन नव्हते, तर ती सामाजिक संबंधांना चिकटवून ठेवणारा 'स्नेहाचा डिंक' होती. ती फोडून तयार ठेवलेली सुपारी अण्णाजींची दूरदृष्टी आणि तत्काळ आदरातिथ्याची सवय दर्शवत होती. हा सुपारीचा भरडा मित्रांना आणि हितचिंतकांना एका चिमटीत वाटून देणे, ही त्यांच्यातील मैत्रीच्या नात्यात गोडवा भरण्याची कला होती.

हा केवळ मसाला नव्हता, तर संघ आणि जनसंघाच्या कार्यात माणसाला जोडण्यासाठी केलेला 'मैत्रत्व गुंतवणुकीचा भाग' होता, ज्यामुळे बंध अधिक घट्ट होत असत. ही बंडी अजूनही माझ्या मनात जिवंत आहे, कारण तिचे सौंदर्य बाह्य नव्हते, तर अंतर्गत मूल्यांमध्ये दडलेले होते.

## मन्याच्या काव्या

# हिचा बचत (?) गट

"अहो ऐकलतं का ? एक हजार रुपये द्या बरं"- सौ.ची ही सकाळी सकाळी अवास्तव मागणी ऐकताच मी हबकलोच. एक-दोनदा दुर्लक्ष केलं, पण हातातलं प्रत्येक भांडं जोरजोरात वाजुवून "अहो...अहो..." करू लागली. आता भांडे चपकायच्या आत आणि माझा "हाय हाय" म्हणून निषेध व्हायच्या आत मी पैसे देण्याची तयारी मान डोलावून व हाताने 'थांब देतो' असा इशारा करून सांगितले. "अगं कशाला हवेत हजार रुपये ते तर सांग... मी खाजगी कंपनीतला नोकर माणूस... महाराष्ट्र सरकारसारखी एवढी रक्कम विनाकारण खर्च करायचे झेपायचे नाही मला..." पण सौ. आपल्या आईसारखी हट्टी असावी, "अहो तुम्हाला काय करायचं आहे...पंधरा दिवसात परत करते व्याजासकट माझ्या लाडक्या देवा भावाने मुंबईहून पाठवले म्हणजे... मग तर झालं..." सरकारच्या या लाडक्या बहिणी असल्याने मी निमुटपणे एक हजार रुपये हातात ठेवले. "अगं काय करणार हे तर सांग ?" "आम्ही चार मैत्रिणी मिळून व्यवसाय करणार आहोत. आम्ही एक बचत गट स्थापन करणार आहोत. प्रत्येकीने भांडवल म्हणून हजार रुपये जमा करायचे आहे." "चार मैत्रिणी व तू मिळून पाचच हजार होतील! पाच हजारांत कोणता व्यवसाय करणार तुम्ही?" " ते गुपित आहे...बरं मी येते हं बर्डे काकूकडून..." मी बुचकाळ्यात पडलो. पाच हजारांत कोणता व्यवसाय करतील? थोडा विचार केला मग टीव्ही बघत बसलो. बर्डे काकूकडून काही वेळात काम फत्ते झाल्याच्या अविर्भावात सौ. घरी आल्या. "अहो, उद्या मला थोडी मदत कराल. आपल्या घरी मिटींग ठेवली आहे बचत गटाची." म्हणजे माझा उद्या 'रामू' होणार तर. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळेच्या आधीच बिन्नीकाकू, बरडे काकू, अंजुबाई, सुरेखाताई या चार मैत्रीणी आल्या.



वेळेच्या आधी होणारी इतिहासातील ही पहिली मिटींग असावी. सौ.ने पोहे भिजत ठेवले होते, मला ते फक्त फोडणी घालायचे होते. सौ.ने चहा, साखर काढून ठेवले होते. मला फक्त उकळून दूध टाकून सर्व करायचे होते. मिटींगसाठी चक्क हॉलचा दरवाजा बंद करण्यात आला होता. योजना गुप्त पद्धतीने सुरू होती. मी दारापाशी कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. परंतु, विशेष काही समजले नाही. काही वेळाने "अहो, पोहे आणा बरं...आणि चहा उकळायला ठेवून द्या" असा घरच्या नीता अंबानीचा ऑर्डर आला. मी प्रामाणिकपणे ते काम पार पाडले. बायकांच्या पोटात काही राहात नाही, याचा प्रत्यय लगेच आला. रात्री मिटींगमधील काही पॉईंटस उघड करण्यात आले. त्यात बिन्नी काकूंना अध्यक्ष करण्यात आले. त्यावेळी बर्डे काकूंना रागही आला होता म्हणे. त्या बचत गटातून राजीनामा देण्याच्या तयारीत होत्या म्हणे. पण, अंजुबाईंनी आपल्या स्टाईलने तो वाद मिटवला. मात्र, सुरेखाताई शांतच होत्या. नुकत्याच ॲक्युप्रेशर घेऊन आल्या होत्या. इतकेच बुलेटीन बाहेर आले. दुसऱ्या दिवशी मी नित्यनेमाने नोकरीवर निघून गेलो. सायंकाळी आलो तर दाराला कुलूप होते. शेजारच्या जैन काकूंनी चाबी दिली. "बहुने कहा है की वो रात को देर से आएगी, खाना वाना बनाके रखो और काळजी मत करो...उबडे पडके सो जाओ..." असा निरोप दिला असे सांगितले. व्यवसायाला जोरदार सुरुवात झाली होती. या चार जणींचे अलायंस हे रिलायंसला टक्कर देतात की काय, असे वाटून गेले. मला स्वयंपाकाची सवय होतीच. बोलणीमध्ये आम्ही मागितलेले सर्व सासरच्यांनी दिले होते. त्यांनी "जावईबापू कधी कधी स्वयंपाक करावा लागेल बरं...स्त्री आता पूर्वीसारखी घराघरात राहणार नाही...माझी मुलगी तर मुळीच नाही" अशी धमकीवजा सूचना मला तेव्हाच दिली होती व मी ती स्वीकारली पण होती. आणि मग सौ. रात्री बारा वाजता आल्या. तोपर्यंत माझ्यातला आचारी पूर्ण अंगात आणला होता आणि आजचे व्यावसायिक बुलेटीन उद्या विचारू, असे ठरवून आम्ही झोपी गेलो. जाग आली ती पहाटे पहाटे दार वाजल्याने. भोपाळचे पाहुणे, पाहुणे कसले लवाजमाच होता तो, आमच्या घरी आलेला. आमच्या घरी पाहुणे भल्या पहाटे पक्षी उठायच्या आत कां येतात, हे कळत नाही. आनंदाचा आव आणत मी स्वागत केले आणि मग सकाळचा चहा-नाश्ता आटोपला. आता यांच्यासाठी कोणती भाजी करायची? आणि स्वस्त वाला गोड पदार्थ कोणता करावा? या विचारात मी होतो. मध्यप्रदेशवाले गोड खाये असतात. गोडाचा आग्रह करणे परवडत नाही त्यांना. म्हणून मी भरपूर व स्वस्त काय होईल, याचा तर्क लावत होतो. माझ्या दृष्टीने रव्याचा शिरा उत्तम. खुप केला तरी दोन दिवस नंतरही खाता येते किंवा मग अर्धा डझन केळी व दोन लिटरमध्ये शिकरण उत्तम किंवा कोहळ्याचं गुळशेलं तर सर्वोत्तम. माझ्या मनातला कोलाहल बहुदा सौ.ने ओळखला असावा. "अहो तुम्ही गोडधोडची मुळीच चिंता करू नका. फक्त माणिकताईकडून त्याच्या फ्रिजमधून आपला गंज घेऊन या." बचत गटाला खुप फायदा झाला दिसतो, या आनंदात मी माणिकताईकडून गंज आणला. बासुंदी होती त्यात. मग आम्ही वाकू वाकू पाहुण्यांना पाहुणचार केला. "और दो...हं...हं...अरे कटोरी भर दो...मनोज भाई" असे त्यांनी स्वतःच आग्रह केला. यथेच्छ भोजन आटोपले. "मन्या भौ...मजा आ गया...जरा कुलर लगाओ...मस्त झपकी ले लेते है..." मग सायंकाळी त्यांनी आमचे घर सोडले व मुक्काम दुसऱ्या नातेवाईकाकडे हलवला. सगळे गेल्यावर मी हिच्याजवळ प्रॉफीटची गोष्ट काढली. कुणाला सांगू नका या अटीवर तिने मला सांगितले. "अहो त्या भगीनी मंडळात आज स्टॉल लावला होता आमच्या बचत गटाने मिल्क शेकचा. पण बायका मोठ्या चरमरीत खाणाऱ्या. सगळ्या धावल्या चाटच्या स्टॉलवर. आम्ही बसलो हात 'शेक'त. कसाबसा जाण्या-येण्याचा खर्च निघाला आणि खूप दूध उरले. मग काय वाटून घेतले प्रत्येकीने". "म्हणजे आपल्या अंगावर बसलं ते" मी म्हणालो. "छे हो...देवाने पाठवले नाही का पाहुणे त्यासाठी! अनायसे गोड होतचं की" मला तिचा व्यवसायिक तर्क पटला. देव पाठीशी असला की असं होतं. मी तिच्या बचत गटाला साष्टांग नमस्कार केला आणि आता रुपये हजारचा बॅकलॉक कुठून भरून काढायचा याचा विचार करीत बसलो. ही कथा कुणालाही सांगायची नाही, या अटीवर अटकून बरं का.

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

# सांस्कृतिक विश्व समृद्ध करणारी लोककला : 'दंडार'



विविधतेतील एकता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. २६ जानेवारीच्या सोहळ्यात दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून देशभरातील वेगवेगळ्या संस्कृतीचे लाईव्ह दर्शन संपूर्ण जगास आपण घडवतो. या निमित्ताने आपल्या देशातील समृद्ध सांस्कृतिक परंपरा संपूर्ण जग अनुभवते.

झाडीपट्टीतील सांस्कृतिक विश्व समृद्ध करणारी अशीच एक लोककला म्हणजे 'दंडार'. प्रामुख्याने पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात 'दंडार' ही लोककला पहायला मिळेल. आमच्या लहानपणी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात दंडारीचे आयोजन व्हायचे. काही गावच्या दंडारी खूपच प्रसिद्ध असायच्या. पंचक्रोशीत अशा दंडार मंडळांना खूप मागणी असायची.

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०

साधारणतः रात्रीच दंडारीचे प्रयोग चालायचे. पूर्वी ग्रामीण भागास इंटरनेटचा स्पर्शही झाला नव्हता. शिवाय मनोरंजनाची साधनेही अत्यल्प असायची त्यामुळे 'दंडार' म्हणजे गावकऱ्यांसाठी एक पर्वणी असायची. घरची कामे आटोपून महिलावर्ग सहपरिवार रात्रीच्यावेळी या दंडारीचा आनंद घेण्यासाठी कार्यक्रम स्थळी पोहचायचे. आसन व्यवस्था म्हणजे भारतीय बैठकच. घरूनच टाकाऊ पोते सोबत न्यायचे, ज्याला आपण बारदाना म्हणतो तेच बसायच्या कामी यायचे. रात्रभर ही दंडार चालायची, कडाक्याच्या थंडीतही रात्रभर कुडकुडत ही दंडार पाहिली जायची. मनोरंजन, विनोद, समाजप्रबोधन यांचा सुयोग्य संगम या दंडारीतून साधला जायचा. साधा स्टेज, साजेशी वेशभूषा आणि ग्रामीण कलावंतांचा उत्तम अभिनय व सादरीकरण यातून दंडारीचे अनेक प्रयोग साकारले जायचे. सार्वजनिक गणेशोत्सव, शारदोत्सव या कालावधीत दंडार मंडळाना विशेष मागणी असायची.

एक पिढी थकली की दुसरी पिढी तयार व्हायची. पण दंडारीचे प्रयोग कधी थांबले नाही, थकले नाही. अगदी लहान मुलांपासून ते तरुण, वृद्ध, महिला, पुरुष आदी सर्व वयोगटातील प्रेक्षक या दंडारीचा आस्वाद घ्यायचे. कारण, या सर्वांना आवडणारे विषय एका दंडारीतून व्यक्त व्हायचे. समाजात घडणाऱ्या चांगल्या, वाईट घटनांचे प्रतिबिंब या दंडारीतून पहायला मिळायचे.

काळाच्या ओघात ही लोककला आता दुर्मिळ झालीय्. पण जुन्या पिढीने दिलेला हा समृद्ध वारसा जपला जावा असे मनोमन वाटते. शासन स्तरावर या लोककलेस पुन्हा एकदा चांगले दिवस यावेत, यासाठी शासनानेही प्रयत्न केल्यास हा सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध होईल.

## वैदर्भीय संस्कृती

# मराठी महिने व सांस्कृतिक परंपरा

मराठी वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासून होते. याच महिन्यात मराठी संस्कृतीचा अभिमान असलेला गुढीपाडवा हा सण, घरोघरी गुढी उभारून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ज्येष्ठ महिन्यात येणारी वटपौर्णिमा; सावित्रीने सत्यवानाचे प्राण वाचविण्यासाठी केलेले व्रत आणि तेव्हापासूनच या सणांची सुरुवात झाली, असे मानल्या जाते. आषाढ महिना लागताच वेध लागतात ते विठुरायाच्या वारीचे. विठुरायाच्या नामघोषात महाराष्ट्र भक्ती रसात न्हाऊन निघतो. याचे विशेष आकर्षण परदेशी पाहुण्यांनाही वाटते. दीप अमावास्येपासून (जिवंतिका पूजन) श्रावणास प्रारंभ होतो. या दिवशी घरात असलेल्या दिव्यांची पूजा केली जाते. नागपंचमी, नव विवाहितांसाठी असलेली मंगळागौरपूजा व जागरणासोबत महिलांच्या समूहाने खेळले जाणारे पारंपरिक खेळ झिम्मा, फुगडी आणि गाणी. गोकुळाष्टमीच्या दिवशी काही भागात अशी प्रथा आहे की, मातीचे गोकुळ बनवून त्यांची पूजा केला जाते.



भाद्रपद महिन्यात हरतालिका व्रत केल्या जाते. असे मानल्या जाते की, देवी पार्वतीने भगवान शंकर पती म्हणून मिळावे यासाठी व्रत केले होते. या दिवशी नदीतल्या वाळूची पूजा करून त्यातून महादेवांची प्रतिकृती साकारल्या जाते आणि सुवासिनी, कुमारिका दिवसभर उपवास करून विविध पत्रे (झाडांची पाने) पूजेत अर्पण करतात. बैल पोळा हा महाराष्ट्रातील कृषी संस्कृतीची जोपासना करण्यासाठी, शेतकऱ्यांसोबत उन्हा-तान्हात राबणाऱ्या सर्जा राजाच्या जोडीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांची खांदेमळन करून, त्यांचं नक्षत्रानुसार (पूर्वा, मघा) नामकरण केल्या जाते आणि ताम्हण वाजवून रीतसर जेवणाचे आमंत्रण दिल्या जाते. लोकमान्य टिळकांनी इंग्रजांच्या काळात समाजाचे एकत्रीकरण करण्यासाठी प्रस्थापित केलेला उत्सव म्हणजे गणेशोत्सव. याच महिन्यात जल्लोषाने साजरा केला जातो. ज्येष्ठा गौरीचे किंवा गौरी गणपती किंवा महालक्ष्मीचे तीन दिवसांचे आगमन घरोघरी केल्या जाते, शिवाय काही भागांत आजही पिढ्यानपिढ्या महाआरतीच्या दिवशी घागरी फुंकल्या जातात. सर्वपित्री अमावस्या, पितृपक्ष किंवा पक्ष पंधरवाडा या पंधरा दिवसांत पितरांचे स्मरण करून विविध पूजा जसे श्राद्ध, पक्ष किंवा अन्नदान केले जाते.

● प्रतीक्षा जोशी
७५५९३१८९३०

अश्विन महिन्यात येणारा नवरात्री उत्सव. या दिवसांत घरोघरी घटस्थापना करून दुर्गा देवीची पूजा, उपासना केली जाते. नऊ दिवस देवीची महाआरती, जागरण, गोंधळ, जोगवा हे विशेष. अष्टमीच्या दिवशी सरस्वतीची प्रतिष्ठापना केली जाते. कोजागिरी पौर्णिमेला जागरण करून घरोघरी केशर, सुकामेवा, वेलदोडे घालून दूध आटवल्या जाते आणि चंद्राची सावली त्यात बघितली जाते. त्यात महाराष्ट्रातील लोकोसत्व असलेला भोंडला, भुलाबाई किंवा हातगा हा सणदेखील साजरा केला जातो.

कार्तिक महिन्यांत विशेषतः ग्रामीण भागांत प्रातःकाली काकड आरती केली जाते व ग्रामदेवतेस ग्राम प्रदक्षिणा घातली जाते. दीपावलीचे पाच दिवस दिव्यांची रोषणाईने मंगलमय वातावरण होते. विविध खाद्य पदार्थांचा, जसे चकली, शेव, चिवडा, लाडू, करंजी, शंकरपाळे यांचा फराळदेखील बनविल्या जातो. याच महिन्यात परंपरेनुसार तुलसी विवाहदेखील केले जातात.

मार्गशीर्ष महिन्यात असलेली देवदिवाळी किंवा नागदिवाळी, चंपाषष्ठी. पौष महिना मकर संक्रांतीचा तीळ-गुळाचा गोडवा नात्यांना जपणारा. फाल्गुन महिन्यात होलिका दहन आणि धुळवड, रंगपंचमी साजरी केली जाते. महाराष्ट्रातील बऱ्याच भागात परंपरेनुसार 'चैत्रागौरी' देवीचे आगमन केल्या जाते.

## भारतीय शेतकऱ्यांसाठी शाश्वत आणि अचूक कीटक नियंत्रणाला प्रोत्साहन

पुणे : कॉर्टेवा ग्रोसायन्सने आपल्या डेलिगेटएँ कीटकनाशकातील अद्यतनांची घोषणा केली, ज्यामुळे मका, कापूस आणि मिरचीच्या भारतीय शेतकऱ्यांसाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापनामध्ये एक विश्वसनीय उपाय म्हणून त्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सिद्ध परिणामकारकता, कीटक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन आणि आर्थिक मूल्यामुळे, डेलिगेट भारतीय शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षमता आणि लवचिकता प्राप्त करण्यास सक्षम करते. अनेक वर्षांपासून, डेलिगेट शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह मित्र राहिले आहे, जे मक्यातील फॉल आर्मीवर्म आणि कापूस व मिरचीतील थ्रिप्ससारख्या हानिकारक कीटकांवर जलद-अभिनय आणि प्रभावी नियंत्रणासाठी ओळखले जाते. हे धोरणात्मक परिष्करण पारंपारिक कीटक नियंत्रणापलीकडे जाते, डेलिगेटचे अद्वितीय वैज्ञानिक गुणधर्म अधोरेखित करते जे पीक संरक्षणासाठी अधिक सक्रिय आणि शाश्वत दृष्टिकोन वाढवतात.

## ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर करतो फॅशनचा पुढचा प्रवास

छत्रपती संभाजीनगर : फॅशन क्षेत्रातील भारतातील सुप्रसिद्ध असलेला ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर, २०२५ मध्ये आणखी एका शानदार आवृत्ती घेऊन परत येत आहे जिथे फॅशन, क्रिएटिव्हीटी आणि संस्कृती या तिन्ही गोष्टी एकत्र येतात आणि 'द वन अँड ओन्ली' असे केवळ एकच व्यासपीठ तयार करतात जे फॅशनमध्ये पुढील मोठे पाऊल ठरणार आहे जिथे ट्रेंड्स बहुतेकदा क्षणभंगुर असतात तिथे फॅशन टूरने सर्वात धाडसी पाऊल उचलले आहे आणि फॅशनला पुढे नेण्याचा आणि 'फॅशनचा पुढचा प्रवास' निश्चित करण्याचा अर्थ काय आहे याची कल्पना पुन्हा मांडली आहे. ही फक्त एक थीम नाही – तर ती एक घोषणा आहे, एक निश्चित विधान आहे की, फॅशनचा पुढचा अध्याय कुठेही सुरू होत नसून तो ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या टप्प्यांवर सुरू होतो.

## स्नॅप २०२५ ची नोंदणी २० नोव्हेंबर रोजी बंद होणार

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ)तर्फे त्यांच्या सिम्बॉयसिस नॅशनल ॲप्टिट्यूड (स्नॅप) टेस्ट २०२५ च्या नोंदणीसाठी २० नोव्हेंबर ही अंतिम तारीख जाहीर करण्यात आली आहे. एमबीए इच्छुकांसाठी ही राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा आहे. उत्कृष्ट शैक्षणिक कारकिर्दीच्या पाच दशकांहून अधिक अनुभवासह सिम्बॉयसिस हा मॅनेजमेंट शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमच प्राधान्यक्रम राहिला आहे. कारण, हा अभ्यासक्रम जागतिक पातळीशी सुसंगत, उद्योगक्षेत्राशी संबंधित आणि सखोल अभ्यास असलेला आहे. यानंतर अर्ज करण्यासाठी अधिक मुदत दिली जाणार नाही.इच्छुकांनी अंतिम तारखेच्या आधी त्यांच्या अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे. ही कम्प्युटर-बेस्ड टेस्ट (सीबीटी) तीन तारखांना घेतली जाईल आणि उमेदवारांना तीन वेळा परीक्षा देता येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी यातील सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील.

## वाढत्या डिझाइन बाजारपेठेसाठी त्यांची वचनबद्धता बळकट

मुंबई: एआरएल ग्रुपने उत्पादित केलेल्या भारतातील आघाडीच्या लक्झरी क्वार्ट्ज ब्रँड स्पेक्टा क्वार्ट्ज सरफेसेसने एसटेक मुंबई येथे त्यांच्या चार सर्वाधिक विक्री होणाऱ्या संग्रहांमध्ये दहा नवीन डिझाइन सादर केले आहेत, जे भारतातील वास्तुकला, डिझाइन आणि बांधकाम साहित्याचे आघाडीचे प्रदर्शन आहे. भारतातील लक्झरी घरांच्या वाढत्या मागणीत, जागतिक स्तरावर प्रेरित परंतु भारतीय सांस्कृतिकदृष्ट्या ग्राउंड क्वार्ट्ज पृष्ठभाग डिझाइन ऑफर करण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला हे अद्वितीय शेड्स आणखी बळकटी देतात. 'एक्स-एलेंस' नावाच्या या नवीन श्रेणीच्या लाँचमध्ये स्पेक्टाच्या चार सर्वात लोकप्रिय संग्रहांमधील दहा रंग समाविष्ट आहेत: मावेन, अल्लुरा, पेस्टल पॉइस आणि ऑरा. मावेन मालिकेत लस्टर ग्रे, लस्टर व्हाइट, लस्टर क्रीम आणि लस्टर रेड यांचा समावेश आहे, तर अल्लुराने ट्यूनिस फॉग, मॉर्निंग मिस्ट आणि सहारा स्वर्ल सादर केले आहे.



## शकुंतला प्रेमराज गव्हाणे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ११ नोव्हेंबर – शकुंतला प्रेमराज गव्हाणे वय ७९७९ यांचे दि ११ मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास वृद्धापकाळाने दुःखत निधन झाले त्यांचा अंत्यविधी दि १२ बुधवारी रोजी सकाळी दहा वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२४३/२०२५

१/– रंगनाथ रामदास वराडे, वय ५९ वर्ष, धंदा शेती, रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/– शालीकराम रामदास वराडे, वय ५७ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/–अन्ना रामदास वराडे, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४/– भगवान रामदास वराडे, वय ४९ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ५/– संजय रामदास वराडे, वय ५७ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बावत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस्प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रामदास दगडू वराडे यांचा दिनांक २७/१२/१९८० रोजी मौजे फर्दापूर, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. व रामदास दगडू वराडे याचा मृत्यू दिनांक १३/०८/२०२३ रोजी फर्दापूर येथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. ते २ है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते २ हे मयत रामदास दगडू वराडे व रामदास दगडू वराडे मांचे वारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे,

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आनरोजी दिनांक १०/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. – १७/११/२०२५

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३०१/२०२५

१. लिलाबाई रामदास सुरडकर, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. महालब्धा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. २. हरीदास रामदास सुरडकर, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. सुरदास रामदास सुरडकर, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा.वरीलप्रमाणे. ४. फुलवंताबाई सुभाष काडेलकर, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा.चिंचखेड, ता. मोताळा, जि. बुलढाणा. ५. कांताबाई गजानन गवळी, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. बोथा फॉरेस्ट, ता. व जि बुलढाणा.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रामदास जगदेव सुरडकर यांचा दिनांक ०४/१०/२०११ रोजी महालब्या येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ५ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत रामदास जगदेव सुरडकर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १०/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे

पु.ता. १७/१२/२०२५

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांसाठी अत्याधूनिक इंटरसेप्टर पोलिस दलात दाखल



अहिल्यानगर, दि. ११ – वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईसाठी अत्याधूनिक इंटरसेप्टर वाहन अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलात दाखल झाले आहे.

राज्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक मुंबई यांच्या आदेशान्वये शहर वाहतूक नियंत्रण शाखेमार्फत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीच्या निर्देशानुसार महामार्ग पोलिस विभाग व जिल्हा पोलिस दलासाठी वितरित करण्यात आलेल्या इंटरसेप्टर वाहनांच्या सहाय्याने ही कारवाई होणार आहे. या अत्याधुनिक वाहनात ४ऊ रडार स्पीडगन, ब्रीथ ॲनालायझर, टिंट मीटर, पी.ए. सिस्टीम, प्राथमिक उपचार किट, फायर एक्स्टिंग्विशर आदी आधुनिक साधनसामग्री बसविण्यात आली आहे.

या वाहनांच्या मदतीने नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर तत्काळ दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी ०१ अधिकारी व ०२ पोलिस अंमलदारांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

या अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहनाच्या लोकार्पण प्रसंगी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी रहदारीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षितपणे वाहन चालवण्याचे आवाहन नागरिकांना केले.

या कार्यक्रमाला अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, स्थानिक गुन्हे शाखेचे किरणकुमार कबाडी, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पो नि बाबासाहेब बोरसे, प्रेमदीप माने तसेच मोटार वाहन विभाग आणि वाहतूक नियंत्रण शाखेचे अधिकारी उपस्थित होते.

# वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत अंतिम मुदतवाढ

अहिल्यानगर, दि. १० :–*केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० तसेच केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार, दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेसाठी वाहनमालकांना ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण २३ फिटमेंट सेंटर कार्यरत आहेत. दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत १ लाख १० हजार १५७ वाहनांनी आतापर्यंत हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवून घेतल्या आहेत.

वाहनमालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी मोटार वाहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाचा – https://transport.maharashtra.gov.in - वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दिलेल्या मुदतीत एचएसआरपी प्लेट न बसवल्यास, मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १७७ नुसार १ हजार रुपयांचा दंड आकारला जाऊ शकतो. त्यामुळे वाहनमालकांनी दंडाची कार्यवाही टाळण्यासाठी आपल्या वाहनावर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट तात्काळ बसवून घेण्याचे प्रादेशिक परिवहन विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# १५ वी राज्यस्तरीय इव्हकॉन २०२५ परिषद संपन्न



छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) वुमन डॉक्टर विंगतर्फे आयोजित १५ वी राज्यस्तरीय इव्हकॉन २०२५ परिषद छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडली. तीन दिवस चाललेल्या या परिषदेचे उद्घाटन राज्याध्यक्ष डॉ. संतोष कदम यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सोहळ्यास राज्य सचिव डॉ. अनिल आव्हाड, माजी अध्यक्ष डॉ. शिवकुमार उत्तुरे, आयपीएस डॉ. अपराजिता अग्निहोत्री, जिल्हाध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कस आणि महिला डॉक्टर विंगच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. संतोष कदम म्हणाले, आयएमए ही डॉक्टरांच्या हक्कांची आणि सुरक्षेची भक्कम ढाल आहे. फलटण येथील महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणात आयएमएने उभारलेला आवाज संपूर्ण राज्यभर दुमदुमला आणि सरकारला एसआयटी स्थापन करावी लागली. महिला डॉक्टरांवरील अन्याय आयएमए सहन करणार नाही. त्यांनी राज्यातील २३० शाखा आरोग्य जनजागृती, रक्तदान, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे नमूद केले.

जिल्हाध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर म्हणाले, इव्हकॉनमुळे राज्यभरातील महिला डॉक्टरांना एकत्र येऊन ज्ञान, अनुभव आणि नेतृत्वगुणांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळते. छत्रपती संभाजीनगर शाखेला या वर्षी यजमानपद मिळणे हा आमच्यासाठी सन्मान आहे.

मुख्य पाहुण्या आयपीएस डॉ. अपराजिता अग्निहोत्री यांनी महिला डॉक्टर हे समाजातील सर्वांत संवेदनशील आणि जबाबदार घटक असल्याचे सांगत स्वसंरक्षण आणि मानसिक आरोग्य जपण्यावर भर दिला. त्यांनी महिलांविरुद्ध वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी समाजात जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.

माजी अध्यक्ष डॉ. शिवकुमार उत्तुरे यांनी आयएमएने डॉक्टरांना व्यावसायिक सुरक्षा दिल्याचे सांगत युवा डॉक्टरांनी मोठ्या प्रमाणावर संघटनेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. राज्य सचिव डॉ. अनिल आव्हाड यांनी आयएमएच्या डिजिटलायझेशन, प्रशिक्षण कार्यशाळा आणि युवा डॉक्टरांसाठी तयार करण्यात येत असलेल्या नव्या उपक्रमांची माहिती दिली.

परिषदेदरम्यान राज्यातील पुरग्रस्त भागात सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा, तसेच पेपर व पोस्टर सादरीकरणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सहभागींचा गौरव करण्यात आला. यावेळी बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट ऐवजी महाराष्ट्र नर्सिंग होम ॲक्ट लागू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असून तो लवकर मंजूर होण्याची अपेक्षा असल्याची माहिती डॉ. कदम यांनी दिली.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:– २५०/२०२५.

अर्जदारः–१) दिलीप रतन माळी उर्फ गोपाळ, वयः– ४० वर्षे, धंदाः– शेती, २) साहेबराव रतन माळी, वय ३७ वर्षे, धंदाः– शेती, ३) रविंद्र रतन माळी उर्फ गोपाळ, वयः ४३ वर्षे, धंदाः– शेती, ४) जिजाबाई रतन माळी उर्फ गोपाळ, वय ६७ वर्षे, धंदाः– शेती, वरील सर्व रा. घोसला ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरुध्द //

गैरअर्जदारः–निरंक.

अर्जः– वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे रतन महादु माळी उर्फ गोपाळ हे दिनांकः–०४/०८/२०२२ ला मौजे धोसला ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे भयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

दिनांकः २७/११/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १०/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३००/२०२५

१/– दुर्गाबाई किसन चव्हाण, वय ७६ वर्ष, धंदा शेती, रा. नांदातांडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/– दौलत किसन चव्हाण, वय २५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत किसन गोबरा चव्हाण यांचा दिनांक ०५.०८..२०२५ रोजी मोजे नांदातांडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं.१ व २ हे मयत किसन गोबरा चव्हाण यांचे वारस असून त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार र्याना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ११/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २४.१२.२५

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

कै. वामनराव कदम बोर्डीकर सेवा संस्था जिंतूर संचलित

**बोर्डीकर कॉलेज ऑफ फार्मसी**

DTE CODE:-02648 MSBTE CODE:- 52352

Affilated by – PCI, DTE, & GOVT.OF MAHARASTRA
Notification for institute level & ACAP Seats 1st year D.Pharmacy 2025-26
Against CAP 2025-26

| SR .NO | Activity | Schedule |
|---|---|---|
| 1. | Display of vacant seats | 06/11/2025 |
| 2. | Application & Registration at institute | 11/11/2025<br>16/11 /2025 |
| 3. | Provisional merit list & submission of Grievance /complaint | 16/11/2025 |
| 4. | Display Final merit list | 16/11/2025 |
| 5. | Reporting of candidates at institute Admission process | 17/11/2025 |

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरीय (Against CAP) प्रवेश प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी महाविद्यालयात नोंदणी करावी.

पत्ता: लोकमंगल नगर ता. सेलू जिल्हा.परभणी
8600842982,9766127325,8180861268

कै. वामनराव कदम बोर्डीकर सेवा संस्था जिंतूर संचलित

**बोर्डीकर कॉलेज ऑफ फार्मसी**

DTE CODE:-02647 MSBTE CODE:- 52351

Affilated by – PCI, DTE, & GOVT.OF MAHARASTRA
Notification for institute level & ACAP Seats 1st year D.Pharmacy & B.Pharmacy 2025-26
Against CAP 2025-26

| SR .NO | Activity | Schedule For D.Pharmacy | Schedule For B.Pharmacy |
|---|---|---|---|
| 1. | Display of vacant seats | 06/11/2025 | 11/11/2025 |
| 2. | Application & Registration at institute | 11/11/2025<br>15/11 /2025 | 11/11/2025<br>16/11 /2025 |
| 3. | Provisional merit list & submission of Grievance /complaint | 15/11/2025 | 16/11/2025 |
| 4. | Display Final merit list | 16/11/2025 | 16/11/2025 |
| 5. | Reporting of candidates at institute Admission process | 17/11/2025 | 17/11/2025 |

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरीय (Against CAP) प्रवेश प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी महाविद्यालयात नोंदणी करावी.

पत्ता:- माथला,ता.जिंतूर जिल्हा.परभणी
8600842982,9766127325,8180861268

## दिल्ली बॉम्बस्फोट मुळे अजिंठा लेणी येथे कडक सुरक्षा



फर्दापूर . काल दिल्ली मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट मुळे महाराष्ट्रामध्ये अर्लट करण्यात आले असून तसेच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये हि कडक सुरक्षा पुरवण्यात आली यावेळी छत्रपती संभाजीनगर चे एस पी डॉ विनयकुमार राठोड व पुरातत्व विभागाचे मनोज पवार यांनी जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे पोलिस कर्मचारी वाढविण्यासाठी चर्चा केली तसेच एस पी साहेब यांनी लेणी मध्ये येणाऱ्या सर्व रस्ते आणि सिसिटिव्ही यांची तपासणी करून जास्तीत जास्त पोलिस कर्मचारी वाढवून देण्यात येईल असे सांगितले

## एमजीएम नर्सिंग कॉलेजतर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ : महात्मा गांधी मिशन मदर टेरेसा कॉलेज ऑफ नर्सिंग, कॉलेज ऑफ नर्सिंग गांधेली आणि इंस्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्क्रीन्स, सोल्स अँड सॅनिटी : मेंटल हेल्थ अँड रिलेशनशिप्स इन अ हायपर-कनेक्टेड वर्ल्ड' या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात उत्साहात पार पडले. या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.शशांक दळवी, केईएम हॉस्पिटल मुंबईचे एमेरिटस प्राध्यापक डॉ.अविनाश सुपे, अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, उपअधिष्ठाता डॉ.प्रवीण सुर्यवंशी, एमजीएम स्कूलच्या संचालिका, प्रकल्प संचालिका डॉ.प्रेरणा दळवी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र. ६६२/२०२५

पु.ता. : १२-१२-२०२५

अर्जदार– १) राधा भ्र. गणेश जाधव, वय २९ वर्षे धंदा गृहिणी २) वेदांत पि. गणेश जाधव वय ०८ वर्षे धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१, ३) अनुष्का पि. गणेश जाधव वय ०७ वर्षे धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ ४) भिमाबाई तुकाराम जाधव, वय ७६ वर्षे धंदा गृहिणी सर्व रा. शिल्लेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :–निरंक

प्रकरण :–कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३०. यांची आई असुन तिचे पति म्हणजेच अर्जदार क्र.४ चा मुलगा नामे गणेश तुकाराम जाधव हा दिनांक १३/०८/२०२१ रोजी मयत झालेला आहे. मयत गणेश तुकाराम जाधव यांना अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०४/१०/२०२५ दिले. प्रकरणात पुढील तारीख १२/१२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.७८५/२०२५

अर्जदार – १) हरीकिसन रामचंद्र पदार, वय ३९ वर्षे, धंदा शेती रा पखोरा ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) हिराबाई भ्र. नवनाथ जोजार, वय ४४ वर्षे धंदा शेती रा भानसहिवरा ता. नेवासा जि. अहिल्यानगर ३) यमुना भ्र. रामचंद्र पदार, वय ७४ वर्षे, धंदा शेती रा पखोरा ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :–निरंक

प्रकरण :– हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.१ व २ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील व अर्जदार क्र.३ चे पति नामे रामचंद्र भानुदास पदार हे मौजे पखोरा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते, ते दिनांक ०२/०७/२०२१ रोजी मौजे पखोरा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रामचंद्र भानुदास पदार यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ११/११/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०९/१२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.५४४/२०२५

अर्जदार :– १) मुमताजबी निजाम शेख वय ५० वर्षे धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) हिलाल निजाम शेख, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) समीर निजाम शेख, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) अमीर निजाम शेख, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :–निरंक

प्रकरण:–कलम ३७२ भारतीय वारसा कायदयान्वये वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस. थी. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे निजाम वावुभाई शेख हे मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत निजाम वायुभाई शेख यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत निजाम वावुभाई शेख यांचे नावे भारतीय स्टेट बैंक शाखा गंगापुर येथे वचत खाते क्र.६२२५१८२२२४१ असा असून सदरील खात्यामध्ये रक्कम रुपये १,०८,३२४.६९ पै./– (अक्षरी एक लाख आठ हजार तीनशे चोवीस रुपये एकोनसत्तर पैसे) आजपर्यंत जमा आहे तसेच मयत निजाम वावुभाई शेख यांनी भारतीय स्टेट बैंक शाखा गंगापुर येथे प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने अंतर्गत रक्कम रु.२,००,०००/– (अक्षरी दोन लाख रुपये) ची मास्टर पॉलिसी काढली असुन तिचा नंबर २४०६००४२२३९९९९९०१ असा आहे, सदर खात्यातील रक्कम व पॉलिसी रक्कम मिळणे कामी अर्जदार यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख १६/१२/२०२५ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ११/११/२०२५ रोजी दिले आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सौहार्दासह सावधगिरीही हवीच

गुजरात एटीएसने रविवारी धडाकेबाज कामगिरी करीत तीन दहशतवाद्यांना अटक केली. दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाया भारताला नवीन नाहीत. भारतासोबत समोरासमोर युद्ध करून जिंकू शकत नाही, याची जाणीव असलेल्या पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाच्या स्वरूपात छद्मयुद्ध धगधगत ठेवण्याचा प्रयत्न चालविला हा इतिहास आहे. पाकिस्तानचा दिवंगत हुकूमशहा जनरल झिया उल हकने 'ऑपरेशन टोपॅक'च्या माध्यमातून दहशतवादी हल्ले करीत भारताला किती तरी वेळा रक्तबंबाळ केले. काँग्रेस काळात दहशतवादाच्या विरोधातले धोरण गुळमुळीत होते. २०१४ पासून दहशतवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यात आली. सुरक्षा यंत्रणांना कारवायांसाठी मुक्तहस्त देण्यात आला. त्यानंतर अलिकडेच पहलगाम येथील हल्ल्याला प्रत्युत्तर देताना 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला धडा शिकवला. मात्र, कट्टरवादी कधीही आणि कोणत्याही स्वरूपात दहशतवादी हल्ले घडवू शकतात आणि त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरूच असल्याचे गुजरात एटीएसने रविवारी केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले. दहशतवाद्यांनी अत्यंत जहाल अशा रिसिन विषाच्या माध्यमातून नरसंहार घडवण्याचा कट रचल्याचे या कारवाईत समोर आले. आतापर्यंत स्फोट घडवणे, गोळीबार करणे, लोन वुल्फ अटॅक, आत्मघाती हल्ले या स्वरूपातील दहशतवाद लोकांनी पाहिला आहे. मात्र, घातक स्वरूपाच्या विषाचा वापर सामूहिक नरसंहारासाठी करण्याचा कट शिजत असल्याचे देशाला प्रथमच कळले. देशासमोर या माध्यमातून जैविक आणि रासायनिक दहशतवादाचे नवीन विक्राळ स्वरूप समोर आले.

रिसिन हे अत्यंत विषारी नैसर्गिक प्रथिनजन्य विष आहे. ते एरंडीच्या बियांपासून तयार केले जाते. पेशीतील प्रथिने तयार करणाऱ्या घटकाला निष्क्रिय करणारे हे विष. ते पेशीतील प्रथिन संश्लेषण रोखते आणि विषाला पेशीत प्रवेश करण्यासाठी मदत करते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. रिसिन शरीरात गेल्यावर पेशींचा नाश होणे सुरू होते आणि अवयव निकामी होऊ लागतात. रिसिनचे काही मायक्रोग्रॅम प्रमाणही मानवासाठी घातक ठरू शकते. हे जहाल विष श्वसनाद्वारे गेल्यास फुफ्फुसांचा गंभीर दाह आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. ते आहाराद्वारे शरीरात गेल्यास उलटी, जुलाब, पोटदुखी आणि मूत्रपिंड निकामी होण्यासारख्या गुंतागुंती उद्‌भवू शकतात. महत्त्वाचे म्हणजे रिसिनसाठी कोणतेही प्रतिऔषध उपलब्ध नाही. त्यावर केवळ लक्षणांवर आधारित उपचार आहेत. रिसिन अल्प प्रमाणातही प्राणघातक ठरते. हत्यांसाठी रिसिनचा वापर झाल्याची उदाहरणे असली तरी, मोठ्या प्रमाणात प्राणहानी करण्यासाठी त्याचा आजवर वापर झालेला नाही. १९७८ मध्ये सर्वप्रथम रिसिनचा वापर हत्येसाठी करण्यात आला होता. हा प्रकार लंडनमध्ये घडला. तिथे जॉर्जी मार्कोव्ह नावाच्या राजकीय अभ्यासकाला धारदार पॅलेटद्वारे रिसिन टोचून त्याची हत्या करण्यात आली होती. शवविच्छेदन अहवालात त्याच्या शरीरात रिसिन आढळले होते. या घटनेनंतर रिसिनच्या घातकतेकडे जगाचे लक्ष वेधले गेले होते. अनेक देशांनी या घटकाच्या वापरावर आणि वाहतुकीवर नजर ठेवण्यास सुरू केली. २०१३ मध्ये अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि काही सिनेटर्सना रिसिनचा वापर केलेली पत्रे पाठवण्यात आली होती. वेळेवर कारवाई होऊन ती पत्रे जप्त करण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. यातील अनेक प्रकरणे स्थानिक गुन्हेगारीशी संबंधित होती. त्याला दहशतवादाचा आयाम नव्हता. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जागतिक पातळीवर रिसिनवर कडक नियंत्रण आहेत. यासंबंधीच्या संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानला धडा शिकवला. त्यानंतर जम्मू-काश्मिरात तुरळक प्रमाणात दहशतवादी कारवाया झाल्या. मात्र, अत्यंत घातक स्वरूपाचा दहशतवादी कट हा प्रथमच समोर आला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवादी संघटनांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. अशा काळात दहशतवादी संघटना काही काळ शांत बसतात आणि नंतर दबाव झुगारण्यासाठी मोठा हल्ला घडवतात. त्यानुसारच हल्ल्याचा कट रचण्यात आल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. यावेळेस हल्ल्याची पद्धत बदलण्याचा प्रयत्न दहशतवाद्यांनी केला. हा कट उधळून सुरक्षा यंत्रणांनी मोठा घातपात टाळला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आजपर्यंत दहशतवादाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. हा बदल केवळ हल्ल्यांच्या तंत्रात नाही, तर त्यामागील विचारसरणी, तंत्रज्ञानातही दिसून येतो. पूर्वी दहशतवादी संघटना म्हणजे ठरावीक भूभागात केंद्रिकृत लष्करी शिस्तीत चालणारे गट असायचे. आयरिश लिबरेशन आर्मी, लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम किंवा अल-कायदा ही त्याची उदाहरणे आहेत. या गटांकडे स्पष्ट नेतृत्व, प्रशिक्षण केंद्र आणि निधीचे स्थिर स्रोत असत. आता मात्र विकेंद्रित पद्धतीने दहशतवादी संघटना काम करतात. त्या 'सेल' आधारित रचना निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्यांना शोधणे, नियंत्रणात ठेवणे किंवा पूर्णतः नष्ट करणे अधिक अवघड झाले आहे. इंटरनेट आणि समाज माध्यमांनी दहशतवादाला नवीन परिणाम दिले आहेत. दहशतवादी संघटना मोठ्या प्रमाणावर प्रचार, निधी संकलन, भरती आणि संवादासाठी इंटरनेटचा वापर करतात. सायबर दहशतवाद म्हणजे संगणक प्रणाली, सरकारी डेटाबेस, वीज, परिवहन, बँकिंग आदी संरचनांवर सायबर हल्ले करून भीती आणि गोंधळ निर्माण करतात. काही संघटनांनी 'डार्क वेब' आणि 'क्रिप्टोकरन्सी'द्वारे आपले आर्थिक व्यवहार गुप्त ठेवण्याचे तंत्र विकसित केले आहे. दहशतवाद नेहमी संघटित स्वरूपात असतोच असे नाही. अनेक वेळा समाज माध्यमांवरून कट्टर विचारांनी प्रभावित होऊन एखादी व्यक्ती स्वतःच दहशतवादी हल्ल्याची योजना आखते आणि अंमलबजावणी करते. या प्रकाराला लोन वुल्फ अटॅक म्हटले जाते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे 'बायोटेररिझम' आणि 'केमिकल टेररिझम' हे नवे धोके निर्माण झाले आहेत. अल्प साधनांतही विषारी घटक, जैविक संसर्गजन्य घटक किंवा रासायनिक शस्त्रे तयार करून नरसंहार घडवणे शक्य झाले आहे. अशा प्रकारचे प्रयत्न अनेक वेळा अपयशी ठरले असले, तरी मानसिक परिणाम आणि सार्वजनिक भय निर्माण करण्याची त्यांची क्षमता मोठी आहे. त्यामुळेच अशा प्रयोगांवर कठोर नियंत्रण ठेवले जाते. अशा प्रकारच्या हल्ल्याचा प्रयत्न देशात झाला आहे.

दहशतवादाच्या मुळाशी अनेकदा असमानता, धार्मिक द्वेष, आर्थिक अन्याय, राजकीय उपेक्षा आणि परस्पर अविश्वास देखील असतो. या सर्व गोष्टींचा मुकाबला करण्यासाठी सामाजिक सौहार्द म्हणजेच सामाजातील परस्पर प्रेम, सहिष्णुता आणि एकात्मता अत्यंत आवश्यक ठरते. सामाजिक सौहार्द हे फक्त एक नैतिक मूल्य नसून, ते दहशतवाद रोखण्याचे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. सामाजिक सौहार्द म्हणजे विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृती असलेल्या लोकांमध्ये परस्पर आदर, सहअस्तित्व आणि समतेची भावना वाढवणे. जिथे परस्परांच्या श्रद्धा, परंपरा आणि विचारांचा सन्मान करतात, तिथे समाजात एकोपा निर्माण होतो. भारतासारख्या बहुविविधतेने नटलेल्या देशात हे मूल्य अधिक महत्त्वाचे ठरते. समाजात सौहार्दता टिकते, तेव्हा लोक दहशतवाद्यांच्या प्रचाराला बळी पडत नाहीत. म्हणूनच सामाजिक सौहार्द हा दहशतवादाविरुद्धचा पहिला मुद्दा ठरतो. या लढाईत सामाजिक सौहार्द सर्वांत शक्तिशाली शस्त्र ठरते. जेव्हा प्रत्येक नागरिक समाजातील एकोपा टिकवण्याचे काम करतो, तेव्हा दहशतवादाला पाय रोवण्याची जागाच राहत नाही. सौहार्द म्हणजे केवळ शांततेचे प्रतीक नसते. तो राष्ट्रीय सुरक्षेचा पाया असतो. त्यामुळे समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन एकतेचा दीप कायम तेवत ठेवला पाहिजे. दुसरी आणि त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे सौहार्द राखतानाच सावधगिरी पण बाळगायला शिकले पाहिजे. अत्र-तत्र सर्वत्र सावध असले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने सजग असले पाहिजे. भारतासारखा खंडप्राय देश दहशतवादमुक्त आणि सुरक्षित राहायचा असेल तर सौहार्दाच्या सुदृढीकरणासह सावधगिरीला पर्याय नाही. ▮

## आंतरराष्ट्रीय

# बगराम एअरबेससाठी आटापिटा

**प्रा. जयसिंग यादव**

भारताने अद्याप तालिबानशासित अफगाणिस्तानला अधिकृतपणे मान्यता दिली नसली, तरी तो मानवतावादी आणि विकासात्मक मदत देत आहे. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वैदिक काळापासून आहेत. कारण गांधार हा एकेकाळी भारताचा भाग मानला जात होता. अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीत भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने तालिबानला मान्यता दिली नसली, तरी नेहमीच मानवतावादी मदत दिली आहे. भारताने तेथे रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन बांधले आहे. तालिबानची राजवट असूनही भारताने अन्नधान्य, औषधे, भूकंप मदत, कोविड लस आणि इतर आवश्यक साहित्य पाठवून अफगाणिस्तानशी चांगला शेजारधर्म निभावला आहे. तालिबानला हेदेखील समजले आहे की भारतापासून अंतर राखणे व्यावहारिक नाही आणि भारत आपल्या हितांचे रक्षण करण्यासाठी तालिबानशी संबंध राखण्यास उत्सुक आहे. विश्वासाचे संबंध असताना भारत आणि अफगाणिस्तानमध्ये जाणीवपूर्व गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. भारताने तालिबान राजवटीकडे कधीही बगराम एअरबेसची मागणी केली नाही, ना अफगाणिस्तानने ते भारताच्या ताब्यात देण्याचे सूतोवाच केले; परंतु अफगाणिस्तान अमेरिकेला बगराम एअरबेस द्यायला विरोध करत असताना भारताला देण्यास मात्र तयार असल्याचे वातावरण तयार करण्यात आले. त्याचा अफगाणिस्तानने लगेच इन्कार केला. याबाबत तालिबान अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, भारताने अफगाणिस्तानमधील बगराम एअरबेसवर देण्याची विनंती केलेली नाही किंवा ऑफरही दिलेली नाही. अफगाण अधिकाऱ्यांनी असे दावे बनावट असल्याचे सांगत फेटाळून लावले.

वस्तुतः भारताच्या सध्याच्या अफगाण प्रशासनाशी असलेल्या भागीदारीवर काही विशिष्ट गटांकडून शंका उपस्थित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले. बगराम एअरबेस अमेरिकेने विकसित केला होता आणि अफगाणिस्तानमधील वीस वर्षांच्या लष्करी मोहिमेदरम्यान एक प्रमुख एअरबेस म्हणून काम केले होते. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी उघडपणे तशी इच्छा व्यक्त केली आहे. तथापि, अफगाण तालिबानने ट्रम्पची मागणी स्पष्टपणे नाकारली आहे. अफगाण लोक धमक्यांना घाबरत नाहीत; उलट आम्ही आणखी २० वर्षे लढण्यास तयार आहोत, असे खणखणीत प्रत्युत्तर दिले आहे. जंग जंग पछाडूनही अमेरिकेला अफगाणिस्तान जिंकण्यात कधीही यश आले नाही. उलट, अमेरिकन सैन्याच्या नाराजीमुळे तर ज्यो बायडेन यांच्या काळात अमेरिकेला तिथून आपले सैन्य मागे घ्यावे लागले होते.



अमेरिका, चीन आणि पाकिस्तान या सर्वांचे लक्ष बगराम एअरबेसवर आहे. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवू इच्छित आहे, मात्र ते चीनच्या अणु प्रयोगशाळेपासून अगदी जवळ आहे. ते व्याप्त काश्मीर (पीओके) आणि बलुचिस्तानपासूनही जवळ आहे. शिवाय, ते संपूर्ण मध्य आशियामध्ये प्रवेश प्रदान करते. अलिकडेच अफगाण तालिबानने हा एअरबेस भारताला सोपवल्याची बातमी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरली. तथापि, अफगाण सरकारी अधिकाऱ्यांनी हे वृत्त निराधार असल्याचे सांगत फेटाळून लावले.

चीनची सर्वांत जवळची अणु प्रयोगशाळा बगराम एअरबेसपासून २००० किलोमीटर अंतरावर, वायव्य चीनमधील लोप नूर नावाच्या परिसरात आहे. हे अंतर रस्त्याने किंवा इतर मार्गांनी अनेक तासांचे असू शकते. तथापि, लॉकहीड एसआर-७१ ब्लॅकबर्डसारखी आधुनिक लष्करी विमाने ते सुमारे एका तासात पार करू शकतात. पाकिस्तान, तुर्कस्तानसह अन्य काही देशांनी विरोध केल्यानंतर भारताला अलिकडेच आपला देशाबाहेरचा जगातला एकमेव असा ताजिकिस्तानमधील आयनी एअरबेस सोडावा लागला. ताजिकिस्तानमधील हवाई तळ भारतासाठी महत्त्वाचा होता; परंतु तो गमवावा लागल्यानंतर भारताला दुसऱ्या हवाई तळाची गरज आहे. असे असले, तरी भारत कोणावर दबाव आणून पदरात काही पाडून घेईल, असे नाही. दोन्ही राष्ट्रांना तशी गरज वाटली आणि त्यात दोघांचा फायदा आहे, याची खात्री पटली, तरच बगराम एअरबेसबाबत निर्णय होईल. बगराम एअरबेस भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने मध्य आशियातील आपला ताबा कायम ठेवला पाहिजे. मुख्यतः इराणच्या चाबहार बंदरात भारताने पन्नास अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. व्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमध्ये अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानच्या कोणत्याही नापाक कृतींना त्वरित प्रत्युत्तर देण्यात भारताला या तळाची मदत होणार आहे. तथापि, पाकिस्तानला नेहमीच भीती राहील की अफगाणिस्तानच्या माध्यमातून भारताकडून धोका होऊ शकतो. भारताने बगराम एअरबेस ताब्यात मिळण्यासाठी व्यूहात्मक पावले टाकताना मित्रराष्ट्र दुखावणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे.

येथे नमूद करण्याजोगी बाब म्हणजे बगराम एअरबेस दुसऱ्या देशाच्या ताब्यात जाता कामा नये. तसा तो गेला, तर भारतासाठी आणि संपूर्ण प्रदेशासाठी डोकेदुखी ठरेल. अफगाणिस्तानमधील पुनर्बांधणीच्या प्रयत्नांमध्ये भारत सहभागी आहे, म्हणून सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे बगराम ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भारताने हा हवाई तळ तालिबानकडून मिळवावा. भारताचे अफगाण तालिबानशी उत्तम संबंध आहेत. अलिकडेच अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी भारताला भेट दिली आणि तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंधांना एक नवी झळाळी मिळाली आहे. अफगाणिस्तानने अलिकडेच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अफगाणिस्तानमधील तालिबान राजवट लवकरच भारतात एका राजदूताची नियुक्ती करणार आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी दृढ होतील, असे मानले जाते. गेल्या महिन्यात अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आठ दिवस भारतात होते, तेव्हा पाकिस्तानने अफगाणिस्तानचे निर्णय दिल्लीतून होतात, अशी टीका केली होती. याचा अर्थ अफगाणिस्तान भारत सरकारच्या सांगण्यानुसार कारभार करते आहे, असा होतो. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध सुधारत असताना तालिबान आणि भारतात कटुता निर्माण व्हावी, असा काहींचा प्रयत्न आहे.

गेल्या काही दिवसांपासून 'सोशल मीडिया' आणि काही आंतरराष्ट्रीय पोर्टलवर अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस भारताला सोपवल्याच्या बातम्या वेगाने पसरत होत्या. या बातमीने दक्षिण आशियातील राजकीय घडामोडींबद्दलच्या अटकळींना उधाण आले होते; पण आता अफगाण तालिबान प्रशासनाने या सर्व अटकळींना पूर्णविराम दिला आहे. अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस हा देशातील सर्वांत मोठा आणि सर्वांत आधुनिक लष्करी हवाईतळ आहे. राजधानी काबुलच्या उत्तरेला सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेले हे शहर १९८० च्या दशकापासून अफगाण लष्करी कारवायांचे केंद्र आहे. ते मूळतः सोव्हिएत सैन्याने विकसित केले होते आणि नंतर २००१ मध्ये अमेरिकेने त्याचे नियंत्रण आपल्याकडे घेतले आणि ते आधुनिक हवाई तळात रूपांतरित केले. अमेरिकन सैन्याने सुमारे वीस वर्षे एक प्रमुख तळ म्हणून बगराम आपल्याकडे ठेवले. ते केवळ अफगाणिस्तानच नव्हे, तर पाकिस्तानच्या सीमेवरही लक्ष ठेवत होते. बगराम हा अमेरिकेचा सर्वांत मोठा हवाई तळ होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडील ब्रिटन भेटीदरम्यान सांगितले होते की, बगराम जगातील सर्वांत मोठ्या हवाई तळांपैकी एक आहे आणि आम्ही ते परत दिले. आता आम्हाला हा तळ परत मिळवायचा आहे. कारण चीन जिथे आपली अण्वस्त्रे बनवतो, तिथून ते फक्त एक तासाच्या अंतरावर आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर वाद निर्माण झाला. परिणामी बगराम आशियाच्याच नव्हे, तर अवघ्या जगाच्या नजरेमध्ये आला. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# आम्ही अस्तित्वही गहाण ठेवले

**चंद्रकांत लोहाणा**

पाश्चिमात्य संस्कृतीच्या नादी लागून आम्ही आमची संस्कृती व परंपरांना तिलांजली दिली. पाश्चिमात्य भोगवादी संस्कृतीचे चटके आता समाजाला बसू लागले आहेत. त्यामध्ये कधी आम्ही स्वतः अडकलो, तर कधी पद्धतशीरपणे त्यांनी आमच्या डोक्याचा वापर करून घेतला. पाश्चिमात्य शक्तीने आमच्या परिवाराला तोडले आणि आम्ही आधुनिक बनण्याच्या नादामध्ये आमचे अस्तित्व त्यांच्याकडे गहाण ठेवले. या शक्तीने भारतामधील एकत्र कुटुंब पद्धतीवर घाला घालून त्यांनी भारताला बाजाराचे रूप दिले आहे. त्यांना आमच्या संस्कार, परंपरा आणि चालीरीतींशी काहीएक देणे घेणे नाही. त्यांचे दैवत म्हणजे निव्वळ पैसा. एकत्र परिवार तुटला की, बाजार फुलतो. हे त्यांच्या हिताचे असते. विदेशी कंपनीच्या मायाजालामध्ये आम्ही अलगद अडकलो. परिवाराचे विभाजन झाले की, वस्तूंची विक्री वाढते एवढे साधे त्यांचे गणित. कुटुंबाची संख्या वाढली की, बाजारामध्ये रेलचेल सहज वाढते आणि वस्तूंची विक्री सहज करता येते. त्यामुळे विदेशी कंपन्यांनी नेमका भारतीय संस्कृतीच्या मुळावर घाव घालून भारतीय कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. आजमितीस बहुतांश कुटुंबाचा आकार कमी होत गेला आहे. तीन चार पिढ्यांची एकत्र कुटुंबे आता दुर्मिळ होताना दिसत आहेत. शहरी भागामध्ये तर आता 'हम दो हमारे दो'ने 'हमारा एक'ची जागा घेतली आहे. हे अतिशय घातक विष पेरले जात आहे.

पूर्वी सिनेमा आणि नंतर दूरदर्शनने पद्धतशीरपणे या मोहिमेस हातभार लावला. नैतिकतेचे सर्व मापदंड बाजूला ठेवून या मालिका प्रत्येकाच्या डोक्याचा ताबा घेऊ लागल्या. सासू आणि सुनेचे भांडण दाखविणाऱ्या मालिकेने अक्षरशः धमाकूळ घालून आपल्या संस्कृतीवर घाला घातला. अशा मालिका आई-वडिलांसह मुलं बघत असतील तर त्या कोवळ्या मनावर काय परिणाम होतील याचा पालकांनी कधीच विचार केला नाही. मुलगा आणि सुनेला आपले सासू-सासरे नकोसे झालेत. नातू आणि पणतू निराश्रित झालेत. महागड्या शाळांमध्ये नाव टाकले की, पाल्यांची जबाबदारी संपली ही प्रथा आता रूढ झाली आहे. मुलांना सर्व प्रकारच्या सुखसोई दिल्या की, आपण मोकळे ही विदेशी भावना दिवसेंदिवस रुजताना दिसून येत आहे. आपल्या आई-वडिलांशी सहज संवाद व्हावा, आपल्या भावनांना त्यांनीही महत्त्व द्यावे, अशी त्यांची या वयामध्ये अपेक्षा असते. नेमकी येथेच आजी-आजोबांची गरज असते. परंतु, बदलत्या सामाजिक रचनेमुळे पूर्वीच्या संकल्पना आता धुळीस मिळू लागल्या आहेत. त्यामुळे संवाद कमी झाला अन् अनिर्बंधता वाढीस लागली. या अनिर्बंधेतला आज आवर घातला नाही तर भविष्यही आम्हाला कधीच माफ करणार नाही. भारतीय संस्कृतीचा आधारच कुटुंब राहिला आहे. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे प्रमुख केंद्र आहे. कुटुंब प्रत्येकाच्या आयुष्याला आकार देऊन समाजाला जोडते. राष्ट्र निर्माणाच्या कार्यामध्येही कुटुंबाचे एक आगळेवेगळे महत्त्व आहे. पिढ्यान्‌पिढ्या संस्काराचे संक्रमण करणारी कुटुंब नावाची ही संस्था आम्हीच मोडकळीस काढली आणि आधुनिकतेची कुऱ्हाड पायावर मारून घेतली. भौतिक सुखाच्या नादामध्ये आम्ही आमची भावी पिढी नैराश्याच्या गर्द काळोखामध्ये लोटली. त्यामुळे ती वेगवेगळ्या गॅझेट्समध्ये भविष्य शोधू लागली. आधुनिकता ही जरी काळाची गरज असली तरी ती कितपत आत्मसात करावी, यालाही काही मर्यादा असायला हव्यात. त्यासाठीच आपले परंपरागत संस्कार आणि परंपरांना तिलांजली देऊन वाटचाल करणे म्हणजे एक प्रकारे आत्मघात करणेच ठरेल. कुटुंब हे संस्काराची शाळा व घरातील प्रत्येकाला आकार देणारी संस्था आहे. कुटुंब ज्याप्रमाणे घरामधील प्रत्येक व्यक्तीचा आधार असते, त्याचप्रमाणे ते समाजाच्याही आधाराचं आणि आदराचं स्थान असते. 'हे विश्वची माझे घर' अशा संस्कृतीमध्ये आम्ही जन्म घेतला असला तरी आम्हीच आमच्या घराचे चार तुकडे करण्यात अग्रेसर आहोत. परंपरांना अव्हेरून असेच आम्ही मार्गक्रमण करीत राहलो तर येणारे भविष्य आम्हाला कधीच माफ करणार नाही. ▮

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# आठव्या वेतन आयोगाच्या निमित्ताने...

**दत्तात्रेय आंबुलकर**

केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी, आठव्या वेतन आयोगांतर्गत त्रिस्तरीय समितीची घोषणा केली व अपेक्षेनुरूप त्यावर विविध प्रकारच्या प्रतिक्रियाही आल्या. यामध्ये निवडणुकीच्या राजकरणापासून, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना वाढीव पगाराची खरंच गरज आहे का? यांसारखे प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्याचबरोबर खाजगी-सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यांच्या कामातील जोखीम, कायमस्वरूपी नोकरीची शाश्वती, वेतनाव्यतिरिक्त मिळणारे विविध फायदे या साऱ्यांची तुलनात्मक चर्चा होणे अपरिहार्यच होते. यातूनच केंद्र सरकारने घोषित केलेल्या प्रस्तावित वेतन आयोगाच्या प्रस्तावावरही, स्वाभाविकपणेच साधकबाधक चर्चा सुरू झाली आहे.

वेतन-व्यवस्थापन क्षेत्रातील अभ्यासकांच्या मतानुसार, सद्यःस्थितीत खाजगी क्षेत्रातील सर्वोच्च वा संचालकसदृश पदांवरील व्यक्ती व कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांसारख्या मोठ्या व जबाबदारीच्या वरिष्ठ पदांवरील व्यक्तींना आणि शासकीय अधिकाऱ्यांना मिळणारे वेतन व मिळणारे फायदे यांमध्ये फारशी तफावत आढळणार नाही. तरीही खाजगी कंपन्यांमधील अधिकारी व त्यांच्यासारखे पद व जबाबदारीचे काम करणाऱ्यांच्या मिळकतीमध्ये मात्र सहजच मोठी तफावत आढळून येते. मुख्य म्हणजे, वर्षानुवर्षे असणारी ही वेतनविषयक तफावत, गेली काही वर्षे झपाट्याने वाढती आहे.

पगारदारांच्या वेतनमानाच्या संदर्भातील सध्याची सत्यस्थिती म्हणजे, आज सर्वसाधारण पात्रताधारक कर्मचाऱ्यांना सरकारी नोकरीत मिळणारे पगार हे सर्वांत मोठे आकर्षण ठरताना दिसते. त्यात जर अशी नोकरी ही कार्यालयीन कामकाजाशी संबंधित असेल, तर पाच दिवसांचा आठवडा स्वरूपातील या नोकरीसाठी विशेषतः सहायक वा कर्मचारी म्हणून, अशी नोकरी व त्यातील मर्यादित जोखीम-जबाबदारीसह मिळणारा पगार हे अशा बहुसंख्य कर्मचाऱ्यांसाठी जीवनाचे इतिकर्तव्यच ठरते. सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रस्थापित व वार्षिक एकत्रित पगार व इतर सोयी-फायदे यांचा विचार करून, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उदाहरण विचारात घेता येण्यासारखे आहे. सरकारी क्षेत्रातील बँक असणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांना बँकेतर्फे मिळणारे वेतन व त्याशिवाय प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात मिळणारे फायदे व सवलती लक्षात घेता, त्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक एकत्रित वेतन व फायदे मिळून त्यांना दरवर्षी सुमारे सरासरी २६ लाख रुपये मिळतात. त्याचवेळी खाजगी क्षेत्रातील आयसीआयसीआय वा एचडीएफसी बँक येथील त्याच स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे वार्षिक एकत्रित वेतन व सर्व फायदे मिळून मिळणारी राशी, स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या तुलनेत निम्मी आहे. हीच बाब कॉर्पोरेट वा खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या आणि समान शैक्षणिक पात्रता, पद आणि जोखीम असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातपण लागू होते.



वर नमूद केल्याप्रमाणे केवळ नमुनेदाखल स्वरूपात कर्मचारी स्तरावरील व तुलनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा आकडेवारीचा परिणाम, व्यक्तिगत स्वरूपात कर्मचाऱ्यांपासून कंपनी-व्यवस्थापन स्तरापर्यंत नेहमीच होतात. यातून विशेषतः कर्मचारी-कामगारांच्या मानसिकतेवर व त्यातून त्यांचे कामकाज आणि कार्यक्षमतेवरही परिणाम दिसून येतो. यासंदर्भात उल्लेखनीय व नेहमीच चर्चेत राहणारा मुद्दा म्हणजे, परंपरागतरीत्या केंद्र सरकारच्या संपूर्ण अखत्यारीत असणाऱ्या टपाल खात्यांतर्गत ग्रामीण स्तरापर्यंत टपाल-बँकिंग विभागाचे काम करणारे कर्मचारी समान स्वरूपाचे काम करत असूनही, त्यांना भिन्न वेतनश्रेणी व फायदे का नाहीत?

या आणि अशाप्रकारे कामकाज, कामाची जबाबदारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यामधील वाढ हे मुद्दे नेहमीच चर्चेत येतात. मात्र, त्यावर गांभीर्याने विचार होऊन तोडगा काढण्याचे मात्र फारसे प्रयत्न होत नाहीत. सातव्या वेतन आयोगाची घोषणा, स्थापना, आयोगाचा अहवाल आणि त्याची अंमलबजावणी या विविध टप्प्यांवर हे मुद्दे चर्चिले गेल्याचे जाणकारांच्या स्मरणात असेलच. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, थेट केंद्र सरकारच्या सेवेत व रेल्वे-टपाल यांसारख्या मोठी कर्मचारी संख्या असणाऱ्या खात्यांना वगळून २०१४च्या कर्मचारी गणनेनुसार, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे १८ लाख होती. सातव्या वेतन आयोगाच्या वेळी तुलनात्मकदृष्ट्या असे नमूद केले होते की, त्यावेळी अमेरिकेतील सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या २१ लाख होती. आज हीच तुलना करताना लक्षात येते की, सद्यःस्थितीत भारतात एक लाख लोकसंख्येसाठी १३९ केंद्र सरकारी कर्मचारी आहेत, तर अमेरिकेत तुलनात्मकदृष्ट्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ६६८ आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि विदेश सेवा विभागात आहे. तर त्याचवेळी विविध दूतावासांमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या, जेमतेम एक हजाराच्या घरात होती; तर भारताशी तुलनात्मक महाशक्तीसदृश अशा चीन, अमेरिका व युरोपीय देशांच्या विदेश सेवा विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कैकपटींनी अधिक आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा पगार, पगारवाढ व त्यांना मिळणारे फायदे यांचा विचार करताना, देशातील केंद्र सरकारच्याच अखत्यारीत असणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन उद्योग व आर्थिक-सार्वजनिक सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतनमान व फायदे यांची तुलना होणेही अपरिहार्य आहे. या मुद्यावर देश-विदेश पातळीवरील शिक्षकांचे वेतन-फायदे व इतर सेवाशर्ती इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास संशोधन स्वरूपात कोलंबिया विद्यापीठाचे कार्तिक मुरलीधरन् यांनी केला आहे. या अभ्यासातून लक्षात आलेली प्रमुख व महत्त्वाची बाब म्हणजे, सरकारी अनुदान व समर्थनाच्या आधारे काही संख्यांमध्ये शिक्षक-अध्यापकांचे पगार दुपटीने वाढवूनही त्यांच्या शैक्षणिक संस्थेचे काम, कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत फारसा बदल झालेला नाही. या साऱ्या आर्थिक-व्यावहारिक पृष्ठभूमी, उपलब्ध संशोधन आणि अनुभवाला यावेळी जोड मिळाली आहे, ती भारताच्या सद्यःस्थितीतील आर्थिक प्रगतीची. त्यामुळे आर्थिक प्रगतीमध्ये आणखी वाढ साधण्यासाठी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीशी त्याची सांगड कशी घालता येईल, हा यावेळी कळीचा मुद्दा ठरला नाही, तरच नवल! ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-३९

मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५

### तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली ।
उठा या हिंदुबंधूंनो स्वदेशाच्या ध्वजाखाली ॥धृ.॥

अभागी पारतंत्र्याची निशा संपे निराशेची ।
झळाळे प्राचिदिक्प्रांती प्रभा स्वातंत्र्यसूर्याची ॥१॥

दऱ्या खोऱ्यांतुनी साऱ्या, पुकारा घालुनी साद् ।
स्वराज्याचा महामंत्र घुमू दे अंबरी नाद ॥२॥

हराया दैन्य देशाचे करू या प्रबळ संघटना ।
नव्या मन्वन्तराची ही असे संजीवनी जाणा ॥३॥

युगी या संघशक्तीच्या स्वदेशा उद्धरायाला ।
नसे एकीविणा जाणा दुजा सन्मार्ग राष्ट्राला ॥४॥

प्रभावी संघशाखांनी बलाने घालवू दैन्य ।
उठू द्या हिंदुजातीचे पुन्हा ते सुप्त चैतन्य ॥५॥

घडाया भारतामाजी पुन्हा सामर्थ्य हिंदूंचे ।
विणा चोहिकडे जाळे प्रभावी संघशाखांचे ॥६॥

## वाचक पत्रे

### दिवाळीव्यतिरिक्त फटाके फोडण्यावर बंदी हवी

आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके फोडले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके फोडले जातात. मग तो सण, उत्सव असो की आनंदाचा प्रसंग. फटाके फोडूनच सण, उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतके फटाके फोडले जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके फोडले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके फोडतात. वाढदिवस साजरा करताना फटाके फोडण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आवाहन करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके फोडूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### भाजपाने सावध असावे

विद्यमान महाराष्ट्र सरकार भाजप नेतृत्वाखाली सोबत घेतलेल्या सवगंड्यांसोबत सत्तेवर आल्यापासून राजकीय आघाड्यांवर सतत काही ना काही घटना घडताना दिसतात. राजकारणात सत्तेसाठी समविचारी नसलेल्या पक्षांशीही काही तडजोड करावी लागणे यात काहीही गैर नाही. तरीही सध्या सोबत घेतलेल्या दोन पक्षांतील काही नेत्यांची बेताल वक्तव्ये, आर्थिक व्यवहारांतील भानगडी जनतेसमोर येतच आहेत. नुकतेच पार्थ पवार यांचे जमीन व्यवहार प्रकरण समोर आल्यानंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. राजकीय आघाडी सांभाळण्यास मुख्यमंत्री सक्षम असले तरीही जनमानसात भाजपावरही त्याचे शिंतोडे निश्चितच उडतात. त्यामुळे भाजप समर्थक सामान्य नागरिकांना अशा राजकीय युतीने काय साध्य झाले हा प्रश्न पडतोच. त्यामुळे भाजपने सावध असावे आणि पक्षाच्या प्रतिमेस जपावे ही सामान्यांची इच्छा असेल.

**राम राजे**/९४२१७७९९४५

●● ●●

### सर्व प्रकारचे खेळ व खेळाडूंकडे लक्ष द्यावे

शहरात व ग्रामीण भागात अनेक मैदानी खेळ शालेय जीवनापासून शिकवले जातात. परंतु आज क्रिकेट या खेळावर जितका पैसा खर्च केला जातो तेवढा खर्च इतर खेळांवर व स्पर्धांवर करताना कुठेही दिसत नाही.

त्यामुळे इतर मैदानी खेळ शालेय जीवनातून बाद होणार तर नाही ना अशी मनात शंका येते. तेव्हा क्रिकेटप्रमाणे इतर खेळ, खेळाडू व त्यांच्या बक्षिसाच्या रकमेत वाढ होणे आवश्यक आहे. तेव्हा याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. ▮

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## खड्ड्यांबाबत कार्यवाहीसाठी जिल्हास्तरीय समिती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यामुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी झाली असून सदर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने आदेश पारीत केलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हद्दीबाहेरील ग्रामीण भागातील क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी, तसेच खड्ड्यांमुळे मृत्यूमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे.

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हद्दीबाहेरील ग्रामीण भागातील क्षेत्रातील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्यूमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याच्यादृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांचाही समावेश आहे. खड्ड्यांबाबत लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच ई-मेलद्वारे तक्रार दाखल करता येईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.



# लातूर मनपा निवडणूक आरक्षण सोडत घोषित

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीची आरक्षण सोडत मंगळवारी घोषित करण्यात आली. मनपाच्या १८ प्रभागातून एकूण ७० सदस्य निवडून द्यावयाचे आहेत. ७० सदस्यांच्या या महापालिकेत एकूण ३५ महिला नगरसेविका राहणार आहेत. लातूर मनपाची शेवटची दुसरी निवडणूक २०१७ साली झाली होती. २०२२ मध्ये मनपाची मुदत संपल्यानंतर तब्बल तीन साडेतीन वर्षांच्या कालखंडानंतर ही निवडणूक होणार आहे. त्यामुळे ही निवडणूक अतिशय चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

लातूर मनपाच्या आयुक्त श्रीमती मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मनपाच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात ही आरक्षण सोडत काढण्यात आली. लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठया काढून ही सोडत घोषित केली गेली. एकूण ७० सदस्यांच्या या महापालिकेत अनुसूचित जाती पुरुष ६, महिला ६, अनुसूचित जमाती पुरुष १, नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष ९, महिला ९, सर्वधारण गटासाठी एकूण ३९ जागा सुटल्या असून त्यामध्ये पुरुष १९ तर महिला २० सदस्य असणार आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १६ मधून प्रत्येकी चार तर प्रभाग १७ व १८ मधून प्रत्येकी तीन सदस्य निवडून द्यायचे आहेत. तत्कालीन लातूर नगर परिषद बरखास्त करून दि. २५ ऑक्टोबर २०११ रोजी लातूर शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली होती. मनपाची पहिली सार्वत्रिक निवडणूक मे २०१२ मध्ये पार पडली होती. तर मनपाच्या पहिल्या महापौर म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्मिता खानापुरे यांनी काम पाहिले होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीत दुसऱ्यांदा अख्तर मिस्त्री याना व त्यानंतर १ वर्ष ८ दिवसांसाठी दीपक सूळ यांना महापौर पदावर विराजमान केले होते. त्यामध्ये अख्तर मिस्त्री यांना अडीच वर्षांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच पायउतार होण्यास भाग पाडले गेले होते. मे २०१७ मध्ये पार पडलेल्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाने पहिल्यांदा लातूर मनपात बहुमत मिळविले होते.

त्यावेळी काँग्रेसमधून भाजपात आलेल्या सुरेश पवारांना भाजपने महापौर पदाची संधी दिली होती. पवारांची अडीच वर्षांची मुदत संपल्यानंतर भाजपचाच महापौर होईल असे अपेक्षित असताना अनपेक्षितपणे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विक्रांत गोजमगुंडे यांनी महापौर पदाची निवडणूक जिंकली होती. भाजपातील अंतर्गत गटबाजीचा फायदा उचलण्यात गोजमगुंडे यांनी यश मिळवून महापौर पद पटकावले होते.

यावेळची मनपा निवडणूक चुरशीची आणि अटीतटीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या वतीने एकत्रित निवडणुका लढवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी कार्यकर्त्यांचा एकंदर कल आणि उत्साह पाहता या निवडणुका प्रमुख राजकीय पक्ष स्वतंत्रपणे लढवून पुन्हा महायुती - आघाडी करतील, अशीही शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. प्रत्यक्षात मनात निवडणुकीचा कार्यक्रम घोषित होण्यास तूर्तास बराच अवधी आहे. प्रमुख राजकीय पक्षांनी त्यादृष्टीने सर्वतोपरी पूर्व तयारीही सुरु केली आहे.

**मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सभागृहात आरक्षण सोडत**

लातूर शहर महानगरपालिका लातूर 2025 आरक्षण तक्ता

| सदस्य संख्या | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण | 70 | 12 | 1 | 18 | 39 |
| महिला | 35 | 6 | 0 | 9 | 20 |

| SN | PRABHAG NO | जागा क्रमांक अ | जागा क्रमांक ब | जागा क्रमांक क | जागा क्रमांक ड |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 1 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 2 | प्रभाग क्र. 2 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 3 | प्रभाग क्र. 3 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 4 | प्रभाग क्र. 4 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 5 | प्रभाग क्र. 5 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 6 | प्रभाग क्र. 6 | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 7 | प्रभाग क्र. 7 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 8 | प्रभाग क्र. 8 | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 9 | प्रभाग क्र. 9 | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 10 | प्रभाग क्र. 10 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण | सर्वसाधारण |
| 11 | प्रभाग क्र. 11 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 12 | प्रभाग क्र. 12 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 13 | प्रभाग क्र. 13 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 14 | प्रभाग क्र. 14 | अनुसूचित जाती महिला | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 15 | प्रभाग क्र. 15 | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 16 | प्रभाग क्र. 16 | अनुसूचित जाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| 17 | प्रभाग क्र. 17 | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण महिला | |
| 18 | प्रभाग क्र. 18 | अनुसूचित जमाती | नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | सर्वसाधारण | |

## प्रधानमंत्री शिष्यवृती योजना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी मिळण्यासाठी याबाबतचे प्रस्ताव संबंधित वेबसाईटवर ऑनलाईन प्रक्रियेद्वारे सादर करण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे.

इयत्ता १२ वी किंवा पदविका अभ्यासक्रमात ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या व प्रथम किंवा द्वितीय वर्षासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या माजी सैनिक /विधवा यांच्या मुलीस ३६ हजार रुपये व मुलास ३० हजार रुपये एवढी वार्षिक शिष्यवृती देण्यात येते.

शिष्यवृतीचे अर्ज ऑनलाईन भरण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०२५ अशी आहे. तरी लातूर जिल्ह्यातील माजी सैनिक/विधवांच्या पात्र पाल्यांचे पंतप्रधान शिष्यवृती योजनेचे अर्ज विहीत मुदतीत भरावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत) यांनी केले आहे.

## दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी प्रशासन कटिबध्द : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** दिव्यांगांप्रती सन्मान आवश्यक आहे. दिव्यांगासाठी आता स्वतंत्र विभागाची स्थापना झाली असल्याने त्यांना मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ सुलभ होण्यास मदत झाली असून जिल्हा प्रशासन दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी मंगळवारी केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात झालेल्या दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना,



समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ड. श्रीराम देशपांडे, डॉ. राजेश पाटील, डॉ. योगेश निटुरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या, ही कार्यशाळा जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी महत्वाची असून दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून ही कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेमुळे कायदेशीर अधिकार सर्वांना परिचित होवून जनजागृती होण्यास मदत होणार आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही दिव्यांगाप्रती संवेदनशीलतेने काम करून आपली जबाबदारी पार पाडावी. दिव्यांगांसाठीच्या आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती या कार्यशाळेतून सामाजिक व न्यायिक चर्चा होणार असून यामुळे मोठे बदल होतील. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा दिव्यांगांसाठी महत्वाचा असून यामुळे त्यांना समाजात सन्मानाची वागणूक मिळेल. प्रशासनही विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांना आधार देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले. सूत्रसंचालन व्यंकट लामजने यांनी तर आभार डॉ. राजु गायकवाड यांनी मानले. यशस्वीतेसाठी सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे, अण्णासाहेब कदम, जयश्री कुलकर्णी, नरसिंग बिरादार, विजय बुरांडे, शिवप्रसाद भंडारे, श्रीकृष्ण लाटे, गणेश पाटील, बालाजी बनसोडे, राजकुमार पवार, ज्ञानेश्वर राव, श्रीकांत उंबरे, गजानन बन, यांच्यासह जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयातील व दिव्यांग शाळांतील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## नांदगाव दत्त जन्मोत्सवनिमित्त सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या नांदगाव येथील दत्त नगरीत दत्त जन्मोत्सवानिमित्त दि. २६ नोव्हेंबर ते दि. ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण, श्रीमद् याग व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दत्त मंदिराचे संस्थापक गुरुवर्य गुलाबगिरी महाराज यांनी ही माहिती दिली.



या सोहळ्यानिमित्त दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी श्री दत्त पालखी सोहळा व नगर प्रदक्षिणा होणार आहे. सोहळ्याचे श्रीगणेश पूजन सागर सुरेश कारंजे यांच्या हस्ते, दीप पूजन विजय पस्तापुरे, बसवराजप्पा वळसंगे, वीणा पूजन रमाकांत कोटीवाले, राजेश्वर बुके, ग्रंथ पूजन हरिदास गिरी, गाथा पूजन भरत गिरी यांच्या हस्ते होणार आहे.सप्ताहात हभप. गोपाळदेव जोशी महाराज ढाळेगावकर, हभप. लीलाताई शिंदे भिंगोलीकर, हभप. भाग्यश्रीताई भरत गिरी, हभप. वामन महाराज मुरंबीकर, हभप. शरदचंद्र महाराज बिराजदार, हभप. प्रशांत महाराज खानापूरकर, हभप. विनोदाचार्य महाराज गेजगे यांची किर्तन सेवा होणारआहे. सप्ताहात नांदगाव, लातूर, ढाळेगाव येथील विविध भजनी मंडळी सहभागी होणार आहेत. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता श्री जन्मोत्सव होईल. त्यानिमित्त हभप. भागवताचार्य महाराज पालमकर यांचे गुलाल काल्याचे किर्तन होणार आहे.

या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थापक गुरुवर्य गुलाबगिरी महाराज, अशोक चांडक, नितीन क्षीरसागर, प्रशांत पटणे , रामेश्र्वर भराडिया, बसवराज वळसंगे, अक्षय केंद्रे, सुमंत कवळीकर, हरीश सुरेश गिरी, गोविंद सोनवळे, रोहित पाटील, मनोज वाघमारे, रामलिंग अंकलकोटे, धीरज तिवारी, माधव ढमाले आदी मान्यवरांनी केले आहे.

## ही लढाई महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्याची : साळुंके

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** प्रा. डॉ.शिवाजीराव जवळगेकर हे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते असून पुरोगामी विचाराचे आहेत. वाजवून सभा घेऊन उमेदवारी कशी मागायची हे त्यांनी लातूरला दाखवून दिले आहे. लातूर मनपा निवडणुकीत तिकीट कुणालाही मिळो, ही लढाई तिकिटाची नसून महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्याची आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी येथे मांडले.

लातूर शहरातील प्रभाग १३ मधील प्रकाशनगर येथील श्री दत्त मंदिराच्या सभागृहात प्रा. शिवाजीराव जवळगेकर व मित्र परिवाराच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, शहर जिल्हाध्यक्ष अॅड. किरण जाधव, मनपा प्रभाग संपर्क प्रमुख सूर्यकांत कातळे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश नवगिरे यांच्या सत्कार सोहळ्यात अभय साळुंके बोलत होते. यावेळी माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब देशमुख, माजी




नगरसेविका श्रीमती कमलताई सोमवंशी, स्वाती जवळगेकर, अॅड. विजय गायकवाड, किरण जाधव, माजी नगरसेवक धोंडीराम यादव, युवक काँग्रेसचे नेते सतीश साळुंके, मुन्ना शिंदे, नालंदा ट्रस्टचे उत्तमराव कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अभय साळूंके यांनी आपल्या भाषणात मनुवादी धर्म मार्तंडानी सव्वा लाख लिंगायत समाजाच्या लोकांची बसवेश्वरांच्या काळात हत्या केली आणि लिंगायत समाजातील बहुसंख्य लोकं त्याचं विचाराच्या भाजपात आहेत. काँग्रेस हा सर्व सामान्यांचा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेसलाच मतदान करणे गरजेचे आहे.

प्रारंभी प्रास्ताविकपर भाषणात प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांनी मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवणुकीत योग्य, निष्ठावंत, इमानदार कार्यकर्त्याला उमेदवारी मिळत नाही.. भांडण करणाऱ्या आक्रमक कार्यकर्त्याला उमेदवारी मिळते.

### प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांनी प्रभाग १३ मध्ये मागितली उमेदवारी

याबद्दल नाराजी व्यक्त केली. शिवाय प्रभाग १३ मध्ये नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या साठी रुग्णालयाची आवशक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. ४० वर्षांपासून इमानदारीने काँग्रेस पक्षात काम केले. इमानदार कार्यकर्त्याला संधी, न्याय मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या सत्कार कार्यक्रमाला प्रभाग १३ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण कांबळे यांनी केले तर अशोक देडे यांनी आभार मानले.

## विलास साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा चेअरमन वैशाली देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** विलास सहकारी साखर कारखाना लिमिटेड, वैशालीनगर, निवळी येथील गळीत हंगाम सन २०२५-२६ चा शुभारंभ मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता करण्यात आला. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते आणि सर्व संचालकांच्या उपस्थितीत गव्हाणीत उसाची मोळी टाकून या हंगामाचा विधिवत शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी गव्हान पूजनही करण्यात आले.



विलास कारखाना कार्यक्षेत्रात गळीत हंगामासाठी ऊसाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. त्यामुळे ऊसाचे वेळेवर गाळप होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याचे संस्थापक चेअरमन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आ. अमित देशमुख आणि चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू करण्याच्या तसेच गळीत हंगामात उच्चांकी गाळप व उच्चांकी उतारा राखण्याच्या सूचना दिल्या आहेत. गत गळीत हंगामाप्रमाणेच हा हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून उभा राहिलेला विलास सहकारी साखर कारखाना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नियोजनानुसार, माजी मंत्री, आ. अमित देशमुख, माजी आमदार धीरज देशमुख आणि कारखान्याचे अध्यक्षा वैशालीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत आहे.

प्रारंभी गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगीची सत्यनारायण पुजा संचालक शाम बरुरे व सौ. पुनम बरुरे यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चे व्हा.चेअरमन अशोक काळे, माजी चेअरमन धनंजय देशमुख, डॉ. सारीका देशमुख, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांच्यासह संचालक सर्वश्री रवींद्र काळे, अमृत जाधव, सतिष शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, संचालक दयानंद बिडवे तसेच माजी संचालक भैरवनाथ सवासे व ऊस उत्पादक सभासद तसेच सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचारी आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

## आणीबाणीचे लोकतंत्र सेनानी मठपतींचा सन्मान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ नोव्हेंबर :** लोकशाहीच्या रक्षणासाठी कारावास भोगलेले येथील अशोक शंकरप्पा मठपती (गुरुजी) यांचा नुकताच लातुरात भारत विकास परिषदेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

भारत विकास परिषदेच्या वतीने लातुरात रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दयानंद सभागृहात 'गोष्ट आणीबाणीची' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे हे होते.

५० वर्षांपूर्वी नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे दमन करणाऱ्या 'देशव्यापी आणीबाणी' मुळे देशभरात असंतोष पसरला होता. या जाचक आणिबाणीविरुद्ध कणखर लढा देणाऱ्या सत्यागृहींचा देशात लोकशाही पुनः प्रस्थापित करण्यामध्ये सिंहाचा वाटा असणाऱ्या सत्यागृहींविषयी 'कृतज्ञता आहे सदैव अंतरी' ही भावना देशवासियांमध्ये आहे. ही कृतज्ञ भावना व्यक्त कारण्यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन केले गेले होते.

या समारंभात २८ लोकतंत्र सेनानी व १५ दिवंगत लोकतंत्र सेनानींच्या पत्नींचा सन्मान करण्यात आला. त्यात वीर माहेश्वर सहकारी



पतसंस्थेचे सचिव अशोक मठपती गुरुजी यांचाही सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. वयाच्या १५ व्या वर्षी मठपती यांनी आणीबाणीच्या घोषणा देऊन सत्याग्रह केला होता. त्यावेळेस त्यांना ५६ दिवसांची शिक्षा झाली होती. यावेळी डॉ. अशोकराव कुकडे काका यांनी आणीबाणीच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारत विकास परिषदेचे अध्यक्ष सुयोग जोशी, कार्यक्रम प्रमुख डॉ. सौ. उमा संतोष देशपांडे, जयदीप कोरे, सचिव रतन झंवर यांसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# खरोळा जि.प. साठी भाजपकडून गोडभरलेंची पहिली उमेदवारी जाहीर

## सर्वाधिक मताधिक्याच्या विजयाचा संकल्प करा : आ. रमेशआप्पा कराड

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ११ नोव्हेंबर :** येत्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातून शिवकन्या महेंद्र गोडभरले यांची जिल्ह्यातील भाजपाची पहिली उमेदवारी जाहीर करून संपूर्ण जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्याने विजय व्हावा या ध्येयाने आजपासून सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे रामवाडी येथे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांचा जन्मदिवस आणि नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन सोहळा लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी सायंकाळी रामवाडी येथे झाला.

यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, दशरथ सरवदे, ओमप्रकाश गोडभरले, अभिषेक आकनगिरे, पांडुरंग कलवले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, शरद दरेकर, उद्धव काळे, जगदीश कुलकर्णी, मनोज कराड, अमर चव्हाण, मंजुषा कुटवाड, मोहन राऊतराव, सुधाकर काळे, पंडितराव उगले, वसंत करमोडे, श्रीकृष्ण मोटेगावकर, लक्ष्मण यादव, ओम चव्हाण यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, महेंद्र गोडभरले यांनी जे काही यश मिळवले ते स्वतःच्या कष्टातून मेहनतीतून आणि आई-वडिलांच्या आशीर्वादाने एका खेड्यातून मायानगरी मुंबईत जाऊन खडतर प्रवास करत कामावर श्रद्धा आणि निष्ठा असल्याने यश प्राप्त झाले असून बंधू प्रेम कसं असावं हे महेंद्र गोडभरले आणि सुरेंद्र गोडभरले यांच्याकडून शिकले पाहिजे एकमेकाबद्दल आदर प्रेम आणि जिव्हाळा असून खऱ्या अर्थाने ही राम लक्ष्मणाची जोडी आहे असे त्यांनी बोलून दाखवले.

मुंबईत सुख समाधान यश मिळाले असताना आपल्या गावाचा आणि परिसराचा विकास झाला पाहिजे, प्रगती झाली पाहिजे या भावनेतून या परिसरासाठी धडपड करणारे महेंद्र गोडभरले यांनी खरोळा जिल्हा




परिषदेच्या विकासाची पाहिलेली स्वप्न येत्या काळात पूर्ण करू अशी ग्वाही देऊन लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडीवस्तीत विविध विकास कामासाठी लाखो नव्हे तर कोठ्यावधी रुपयांचा निधी मंजूर करून आणला असल्याचे आ. कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी नवनाथ भोसले यांनी खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातून शिवकन्या गोडभरले यांना उमेदवारीची मागणी करत आप्पासाहेब तुम्ही जो निर्णय घ्याल ते धोरण असेल आणि तुम्ही जे बांधाल ते तोरण असेल असे बोलून दाखवले तर दशरथ सरवदे यांनी विकासाचे मॉडेल करण्यासाठी भाजप शिवाय पर्याय नाही असे सांगितले. प्रारंभी महेंद्र गोडभरले यांनी प्रास्ताविकात ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण करण्याचा आपले धोरण असून आप्पासाहेबांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला आणि जनतेने दिलेल्या प्रेमाला कदापी तडा जाऊ देणार नाही असे सांगून खरोळा जिल्हा परिषद मतदार संघ विकासाचे मॉडेल व्हावे ही माझी इच्छा आहे असे बोलून दाखविले. शेवटी शिवकन्या गोडभरले यांनी उपस्थितांचे आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण लहाने यांनी केले.

या कार्यक्रमास भागवत गीते, उत्तमराव गोडभरले, नरेश चपटे, शालिक गोडभरले, रमा फुलारी, अनिल कुटवाड, अजय शेळके, महेश सुडे, बालाजी मानमोडे, दिलीप बरुरे, दयानंद बाणापुरे, नामदेव बोबडे, बाबासाहेब शिंदे, व्यंकट कातपूरे, निवृत्ती चिद्रे, बाबुराव कस्तुरे, सुरेश बुड्डे, श्रीमंत नागरगोजे, लक्ष्मण खलंग्रे, प्रेमानंद गोडभरले, राहुल गोडभरले, जनार्दन कलूरे मनोहर कलूरे, उमाकांत गोडभरले श्रीनिवास गोडभरले, बाळू येलगटे, प्रमोद उगिले, नितीन गोडभरले, संजय गोडभरले, संतराम तिरुके, अन्वर कुरेशी, भूषण उगिले, बंटी गोडभरले, प्रमोद कुटवाड, बाळू दिवटे, नामदेव गुरुमे, निवृत्ती गोडभरले, प्रेमानंद गोडभरले, करण सुरवसे, अंकुश सुरवसे, अमोल सुरवसे, सुमित गोडभरले, विकास सुरवसे, बाळू कुचमे, महावीर गोडभरले हेमंत मुसने यांच्यासह खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातील लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते आणि रामवाडी ग्रामस्थ महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

# चापोली ग्रा.पं. सफाई कर्मचाऱ्याचा विजेच्या खांबावरून पडून मृत्यू

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ११ नोव्हेंबर :** चाकूर तालुक्यातील चापोली येथील ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा विजेच्या खांबावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि.११ नोव्हेंबर मंगळवार रोजी सकाळी घडली आहे.



सकाळी दहा वाजेच्या सुमारास चापोली येथील ग्रामपंचायत कर्मचारी सुर्यकांत उर्फ गजानन भिसे (वय ३५) महामार्गालगत असलेल्या सर्वीस रोडवर असलेल्या विद्युत खांबावरील लाईट दुरुस्तीचे काम करण्यासाठी गेला होता. अचानक यावेळी विज प्रवाह चालू झाल्याने ग्रामपंचायत कर्मचारी सुर्यकांत उर्फ गजानन भिसे यांचा विजेच्या शॉकने वरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. भिसे हा चापोली ग्रामपंचायत येथे सफाई कर्मचारी होता. मग तो कोणाच्या सांगण्यावरून विद्युत पोलावर चढला असा सर्वसामान्य जनतेमध्ये उपस्थित केला जात आहे.

पोलारून पडल्यानंतर भिसे यांना तातडीने चाकूर येथील शासकीय ग्रामीण रुणालयात दाखल करण्यात आले.त्यावेळी तपासणी अंती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

सदरील मयत व्यक्तीच गजानन उर्फ सुर्यकांत भिसे यांच्या पश्र्चात आई-वडील, तीन भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आसुन त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.सदर घटनेमुळे संतप्त ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने या घटनेला जो कोणी जबाबदार आहे त्या संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करणार आहोत असे या वेळी

ग्रामपंचायत कामगार सेना चाकूर तालुका अध्यक्ष भरत खलशे, उपाध्यक्ष सोपान कसबे यांनी सांगीतले असून मयत कर्मचारी सुर्यकांत उर्फ गजानन भिसे यांच्या कूटूंबाला योग्य ती मदत मिळावी ही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या प्रकरणांत नेमका कोण दोषी आहे याची तात्काळ चौकशी करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# एफ.एम. सलीम यांचा 'सितारा-ए-सहाफत'ने गौरव

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, ११ नोव्हेंबर :** मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटी, हैदराबाद

**मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटी, हैदराबाद येथे आजाद दिन सोहळ्यात सन्मान**

येथे आयोजित 'आझाद दिवस सोहळ्या'त डेली हिंदी मिलाप या वृत्तपत्राचे ब्युरो चीफ व वलांडी (ता. देवणी) येथील सुपुत्र श्री एफ.एम. सलीम यांना प्रतिष्ठित 'सितारा-ए-सहाफत' या सन्मानाने गौरविण्यात आले.

हा सन्मान सलीम यांना पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल




तसेच उर्दू भाषा आणि संस्कृतीच्या प्रसारासाठी केलेल्या योगदानाच्या मान्यतेस्वरूप प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आझाद मेमोरियल लेक्चर या कार्यक्रमादरम्यान देण्यात आला, जो भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमातील मान्यवर उपस्थिती या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान च-छणण चे कुलगुरू प्रा. सैयद ऐनुल हसन यांनी भूषविले. यावेळी प्रा. इश्तियाक अहमद (नोंदणी अधिकारी), तसेच आझाद दिवस सोहळा समितीच्या अध्यक्षा प्रा. सैयद अलीम अशरफ जायसी यांच्यासह विद्यापीठातील अनेक वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

युनिव्हर्सिटीच्या वतीने सांगण्यात आले की, एफ.एम. सलीम यांनी आपल्या पत्रकारितेद्वारे समाजातील शैक्षणिक आणि भाषिक मूल्यांना प्रोत्साहन देत उल्लेखनीय कार्य केले आहे.

त्यांच्या या योगदानासाठी त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येत आहे. वलांडी गावाच्या या सुपुत्राने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेला हा सन्मान गाव, तालुका आणि जिल्ह्याचा अभिमान वाढवणारा ठरला आहे.

# मंगेशकर महाविद्यालयातील सानिया मुल्ला यांना पारितोषिक प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ नोव्हेंबर :** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील सानिया अजिम मुल्ला (बी.ए.तृतीय वर्ष) यांनी 'राज्यस्तरीय ऑनलाईन हिंदी प्रश्नमंजूषा' स्पर्धेत ५० पैकी ५० गुण मिळवून प्रथम क्रमांक संपादन केल्याबद्दल दि.९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती कार्यालय, पुणे येथे आयोजित पारितोषिक वितरण समारंभात जयराम फगरे (संचालक, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती, पुणे) यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ग्रंथ, प्रमाणपत्र व रोख २५०० रूपये देऊन गौरविण्यात आले.

हिंदी दिन पंधरवड्यानिमित्त व हिंदी भाषेच्या प्रचारार्थ केंद्रीय हिंदी संस्थान आगरा, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, भारतीय



भाषा मंच आणि वैश्विक हिंदी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने व इंडिया एक्जिम बँक, मुंबई यांच्या सहकार्याने दि.२८ सप्टेंबर रोजी प्रस्तुत स्पर्धा घेण्यात आली होती.

सानिया मुल्ला यांना हिंदी विभागप्रमुख डॉ.जाफर चौधरी व डॉ.भगवान कदम यांचे मार्गदर्शन लाभले. शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे, डॉ.सचिन हंचाटे, प्रा.गंगाप्रसाद तोटावार, प्रा.अंजना मुळे, प्रा.पल्लवी डोंगरगावे, रूपेश मोरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सानिया मुल्ला यांना शुभेच्छा दिल्या.

# सरपंच, उपसरपंचासह अनेकांचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ११ नोव्हेंबर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंच पूनम कांबळे, उपसरपंच सूर्यकांत शिंदे यांच्यासह शेकडो जणांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

ग्रामीण मतदार संघातील गावागावात शासनाच्या विविध विभागामार्फत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याने अनेक विकास कामाना गती मिळाली. होत असलेल्या विविध कामांना प्रेरित होऊन अनेक जण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करीत आहेत.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात मंगळवारी लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील सरपंच, उपसरपंच यांच्यासह शेकडोजनांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश केला यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला असून या प्रवेशामुळे येणाऱ्या काळात होणाऱ्या भातांगळी जिल्हा परिषद आणि बोरी पंचायत समिती निवडणुकीत भाजपाचे बळ वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील प्रवेश प्रसंगी भाजपाचे मंडलाध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, विजयकुमार मलवाड, सुरेश पाटील, महादेव साळुंके, पांडुरंग बालवाड, हनुमंत गव्हाणे, आदिनाथ मुळे, मारुती शिंदे, सचिन साबदे, आत्माराम शिंदे, संजय सावंत, तुकाराम शिंदे, राम शेंडगे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बिंदगीहाळ येथील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंच पुनम बाळू कांबळे, उपसरपंच सूर्यकांत शिंदे ग्राम सदस्य कमल सावंत, ओया मांजरे, माजी व्हा. चेअरमन भाऊसाहेब शिंदे, विठ्ठलराव सावंत, सत्यभामा शिंदे, जनाबाई शिंदे, कानिकबाई टेकाळे, कालींदाबाई शिंदे, सुभद्राबाई सावंत, पुष्पाबाई सावंत, अशांतबाई सूर्यवंशी, केवळबाई सावंत, सुभद्रा काळे, वर्षा शिंदे, गणेश कांबळे, अरविंद सुरवसे, ताजुद्दीन शेख, शफी शेख, राजकुमार शिंदे, गोविंद सूर्यवंशी, रामेश्वर सावंत, दत्तू चित्ते, लिंबराज शेंडगे, बलभीम शेंडगे, प्रल्हाद सूर्यवंशी, गोविंद काळे, प्रताप सावंत, सुभाष सावंत, बबन शेंडगे, सोपान सूर्यवंशी, बालाजी सावंत, सुदर्शन सावंत, ज्ञानोबा सूर्यवंशी, गणपत शिंदे निवृत्ती सूर्यवंशी यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

# *वलांडी परिसरात अवैध धंद्यांना ऊत*

***त.भा. वृत्तसेवा,***

***वलांडी, ११ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील वलांडी व परिसर सध्या विविध अवैध धंद्यांचे केंद्रस्थान बनल्याचे चित्र दिसत आहे. गावोगावी दारू विक्री, गुटखा व्यवहार, जुगार, सट्टेबाजी आणि वाळू तस्करी यांसारखे गैरव्यवसाय खुलेआम सुरू असून, प्रशासनाकडून या गैरप्रकारांकडे कानाडोळा केला जात असल्याची नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या विभागांकडून काही औपचारिक छापेमार कारवाया केल्या गेल्या असल्या, तरी या कारवायांचा परिणाम तात्पुरता ठरतो. काही दिवसांनी हे धंदे पुन्हा सुरू होत असल्याने लोकांमध्ये प्रशासनाविषयी असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. वलांडी परिसरात आणि शेजारच्या गावांमध्ये कर्नाटक सीमावर्ती भागातून येणाऱ्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री खुलेआम सुरू असल्याची माहिती मिळत आहे.*



**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, ११ नोव्हेंबर :** सीमा भागातील प्रवाशांची, शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी आणि महिलांची दीर्घकाळची मागणी पूर्ण करत अखेर भालकी डेपोची भालकी-वलांडी ही नवीन एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेचा शुभारंभ कर्नाटक राज्य वन विकास महामंडळाचे उपाध्यक्ष हनुमंतराव चव्हाण.

# केतकी चवळेची शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ नोव्हेंबर :** महाराष्ट्र उदयगिरी कनिष्ठ महाविद्यालय उदगीर येथील खेळाडू कुमारी केतकी चवळे यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालय म. रा. आणि जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत नांदेड येथे संपन्न झालेल्या शालेय विभागीय १९ वर्षाखालील तलवारबाजी क्रीडा प्रकार सेबर स्पर्धेत सांघिक प्रथम तर वैयक्तिक तृतीय क्रमांकाने विजेतेपद पटकावले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते कु. केतकी चवळे यांचा ग्रंथ, शॉल व बुके सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सहसचिव मा. प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, डॉ. कमलाकर गव्हाणे उपस्थित होते. सदर खेळाडूचे संभाजीनगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूला क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रमजू शेख यांनी मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी खेळाडूचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# नगराध्यक्ष पदासाठी लताताई निडवदे यांच्या उमेदवारीची जनतेतून मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ नोव्हेंबर :** नगर पालिकेच्या निवडणूकीचे पडघम वाजत आहे. त्यात 'अ' दर्जा प्राप्त उदगीर नगरपालीकेची निवडणूक व त्या संबंधाने नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारीवरून सर्व स्तरातून चर्चा होत आहे.



लातूर जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे काम निष्टेने सर्व गावपातळीवर पोहोचविण्याचे काम स्व. नागनाथअण्णा निडवदे यांनी अविरतपणे केले आहे. हे करत असताना त्यांनी आपल्या संघविचारावर श्रद्धाभाव मनात ठेवून सातत्यांनी कार्यरत राहिले आणी पक्षाला सोनेरी दिवस आणून दिले. परंतु दुर्दैवाने त्यांना हे वैभवाचे दिवस पाहता आले नाहीत. किंवा व्यक्तिगत स्वार्थ ठेवून सत्तेच्या पदासाठी आग्रही राहिले नाहीत. अनेक पदासाठी संधी येतायेता हुलकावणी देत आली.

परंतु आता उदगीर नगरपलिकेच्या निवडणूकीत नगराध्यक्ष हे महिलेसाठी राखीव असून या पदासाठी उमेदवार म्हणून स्व.नागनाथअण्णा निडवदे यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती लताताई निडवदे यांना उमेदवारी मिळावी अशी पक्ष कार्यकर्त्यांसह सामान्य जनतेतून मागणी होत आहे. स्व. नागनाथ अण्णा यांच्या पत्नी लताताई यांची मागणी उक्त आहे. उमेदवारी मिळाल्यास भारतीय जनता पक्षाचे सबंध कार्यकर्ते त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करतील व संपूर्ण मतदार प्रचंड मतांनी निवडूण आणून खऱ्याअर्थाने स्व. नागनाथअण्णांना श्रद्धांजली अर्पण करतील.असा मतदारातून विश्र्वास व्यक्त होत आहे. उमेदवारी घोषित झाली म्हणजे विजयाची नांदी असल्यासारखे होईल असा आशावाद कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. निडवदे परिवाराचा निस्सीम त्याग समर्पण लक्षात घेऊन आणि विकास कार्याला गती मिळण्यासाठी लताताई निडवदे यांची उमेदवारी घोषित करून कार्यकर्त्यांच्या मागणीचा पक्षानी विचार करावा. असे सर्व स्तरातून बोलले जात आहे.

## खरेदीखताचे मूळ कागदपत्रे गहाळ झाले बाबत

**महताब फतरूसाब पिंजारी रा. तेलगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर. यांचे दि. १३.०७. २०१६ रोजीचे खरेदी खत क्र/दस्त क्र. अमप- २३३९ - २०१६ नुसार सौ. पूजा भ्र. दत्तात्रेय हालसे रा. करडखेड, ता. उदगीर, जि. लातूर. यांच्याकडून ग्रामपंचायत मौजे तेलगाव येथील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन गट क्र. ९४ ज्यांचे एकूण क्षेत्रफळ ०० हेक्टर २० आर मधील ०० हेक्टर २ आर म्हणजेच लांबी पूर्व पश्चिम ६६ फूट व रुंदी दक्षिण उत्तर ३३ फूट ज्याचे एकूण क्षेत्रफळ २०२.४१ चौरस मी असे खरेदी करून घेतले होते.**

**दि. १०.११.२०२५ रोजी वार सोमवार रोजी चाकूर बस स्थानक येथे खरेदी खताचे मूळ कागदपत्रे गहाळ झाली आहेत. सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करावा.**

संपर्क : 8180989996

# ओंकारच्या रूपाने वैद्यनाथचा पुनर्जन्मच; कारखाना देताना प्रचंड वेदना झाल्या

### गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी ना.पंकजाताई मुंडे भावूक

### ओंकार करणार यंदा दहा लाख मे टन ऊसाचे गाळप

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ नोव्हेंबर**

वैद्यनाथ कारखाना हे माझं चौथं अपत्य आहे असं लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब नेहमी म्हणत असंत. हा कारखाना देताना माझ्या मनात प्रचंड वेदना झाल्या हे सांगताना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना गहिवरून आले. ओंकार कारखाना यंदा दहा लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप करणार असून शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस गळीतास आणावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.


ओंकार (वैद्यनाथ) साखर कारखाना युनिट क्रमांक ८ चा द्वितीय बॉयलर अग्निप्रदिपन व गळीत हंगामाचा शुभारंभ ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया थाटात पार पडला, त्यावेळी त्या बोलत होत्या. ओंकारचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, माजी आमदार केशवराव आंधळे, वैद्यनाथचे उपाध्यक्ष चंद्रकांत कराड, संचालक अजय मुंडे, वैद्यनाथ बॅंकेचे अध्यक्ष विनोद सामत, रमेश कराड, शिवाजीराव गुट्टे, श्रीहरी मुंडे, सतीश मुंडे, राजेश गिते, माऊली मुंडे, सुरेश माने, योगेश्वरी शुगरचे चेअरमन रोहित देशमुख, वसंत राठोड आदी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी विधिवत पूजनाने गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. कारखान्याच्या वतीने त्यांचा बोत्रे पाटील यांनी पंकजाताईंचा सत्कार केला.






# आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे किडनी विकार तपासणी व मार्गदर्शन शिबिर




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड (जालना रोड, शाहू बॅंकेजवळ) येथे बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत किडनी विकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

किडनीच्या आजारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, आजार वेळेत ओळखला गेला नाही तर तो जीवघेणा ठरू शकतो. ग्रामीण व शहरी भागातील अनेक रुग्णांना योग्य तपासणी आणि तज्ज्ञांचा सल्ला वेळेत मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे शिबिर रुग्णहितासाठी आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये खालील आजारांवर तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे :

अंगावर सुज येणे
लघवी कमी / लाल होणे
किडनी जंतुसंसर्ग
रक्तदाबामुळे होणारे किडनी विकार
डायलेसिससंबंधित समस्या
किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन

शिबिरात उपस्थित राहणाऱ्या रुग्णांना आवश्यक तपासण्या कमी दरात उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच गरजू रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत डायलेसिस सेवा दिली जाणार आहे.

तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त १००/- ठेवण्यात आले असून, जागा मर्यादित असल्याने वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या शिबिरात राज्यातील सर्वात मोठ्या डायलेसिस सेंटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आनंदऋषीजी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. गोविंद कासट, हे डायलेसिस सेंटरचे प्रमुख असून आपल्या जन्मभूमी बीड येथे रुग्णांना सेवा देणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी, उपचार आणि जीवनशैलीविषयक मार्गदर्शन करतील.

वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी खर्चात सेवा मिळावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सकल जैन समाज, बीड यांच्या वतीने सर्व नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरामुळे बीड शहर व परिसरातील अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून ग्रामीण भागातील जनतेला तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे.नोंदणीसाठी संपर्क : ८२६२००९०९१

# शिवसेना कार्यालय हाऊसफुल; शेकडो इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेना पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या शेकडो इच्छुक उमेदवारांचे मुलाखत सत्र काल सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यलय, बीड येथे पार पडले असून या मुलाखत सत्रादरम्यान जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचे शिवसेना मध्यवर्ती कार्यलय हाऊसफूल झाल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले होते. यामुळे काल सकाळी १०.०० वाजल्यापासूनच शेकडो इच्छुक उमेदवार आपल्या कार्य अहवालासह शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात उपस्थित होते.

# परळीत खा.सोनवणेंचा मास्टरस्ट्रोक; मुंडेंना धक्का देत माजी नगराध्यक्षांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ नोव्हेंबर**

परळीत मुंडेंच्या एकाधिकारशाहीला सूरूंग लावण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी नवनवीन डाव टाकायला सुरूवात केली असून आ.मुंडे यांचे सहकारी तथा परळीचे माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख आणि पत्नी संध्याताई देशमूख यांनी दि.१० नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (शरद पवार गट) प्रवेश केला. सदरील प्रवेश पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.



परळीत आ.धनंजय मुंडे यांच्या राजकारणाला शह देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी सुरूवात केलेली आहे.नगरपालिका निवडणूकीत राष्ट्रवादी शरद पवार गट ताकदीने उतरणार असल्याने शहरातील मात्तबर मंडळी मुंडेंना सोडून पर्यायाची चाचपणी करत आहे. ज्यांना शहराचा विकास व्हावा, असे वाटत आहे, अशी मंडळी मुंडेंपासून दूर होवू लागली असून यात माजी नगराध्यक्ष दिपक देशमूख, त्यांच्या पत्नी संध्याताई देशमूख यांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज मुंबईत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, आ.जितेंद्र आव्हाड, पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड यांची यांची उपस्थिती होती. दिपक देशमूख हे परळीच्या राजकारणात अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. त्यांनी परळीचे नगराध्यक्षपदही भुषविलेले आहे. त्यांच्या कार्यकाळात परळी शहरात मोठ्या प्रमाणात दर्जेदार विकास कामेही झालेली आहेत. दरम्यान, प्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना दिपक देशमूख म्हणाले, येथील आमदार सत्ताधाऱ्यांचे काम पाहिले तर कोणतेही विकास काम त्यांनी केलं नाही. जे काही कामे केली त्यात भ्रष्टाचार करण्यात आला. आम्ही वारंवार ही बाब वरिष्ठांच्या कानावर घातल्यावरही यावर कुठला मार्ग निघाला नाही. परळीतील अर्धवट विकास कामे यामुळे मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सहा महिन्यापासून मी या कामाला लागलो होतो. मी लोकसभेला पंकजा मुंडे यांचे काम केले त्यानंतर विधानसभेला धनंजय मुंडे यांचे काम केले, असेही ते म्हणाले.

दिपक देशमूख हे परळीचा विकास व्हावा, यासाठी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात आलेले आहेत. परळीत कुणाची किती ताकद आहे, ते आता कळणार असून परळीचा गड आम्ही राखू. परळीत सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित बसवून परळी नगर पालिकेचा उमेदवार ठरवला जाणार आहे.
-खा.बजरंग सोनवणे, बीड.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रम

## पर्यावरण संरक्षण हीच ईश्वरसेवा डॉ. हेमंत वैद्य

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व स्वा. सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी एक दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला होता. पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमास उद्घाटक म्हणून श्री जयंत रानडे, स्थापत्य अभियंता सांगली , तर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाईचे मा. अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर उपस्थित होते. तसेच पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमास मार्गदर्शक म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे मा.कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य उपस्थित होते. डॉ. हेमंतजी वैद्य यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये पर्यावरण संरक्षण हीच ईश्वर सेवा आहे असे मानून प्रत्येकाने पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले या उपक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. सुहास मोराळे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले . याप्रसंगी व्यासपीठावर स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलाचे मा.कार्यवाह डॉ. अविनाशजी देशपांडे तसेच संस्थेच्या विद्या सभेचे उपाध्यक्ष मा.उमेशजी जगताप उपस्थित होते.या पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ व हरित परिसर समिती यांच्या वतीने सीड्स बॉल संकल्पनेचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले या प्रात्यक्षिकामध्ये बदाम, सिताफळ, रामफळ, चिंच, एरंडी, लिंब अशा उपयुक्त विविध झाडांच्या बिया चिखलांच्या गोळ्यांमध्ये ठेवून त्याचे बॉल कसे बनवले जातात व या माध्यमातून आपण पर्यावरण संरक्षण कसे करू शकतो याचे प्रात्येक्षिक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. गंगाधर उषमवार व भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. अशोक डोके यांनी विद्यार्थ्यांना व मान्यवरांना करून दाखवले अशा उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण समतोल राखण्यास कशी मदत होऊ शकते ही संकल्पना राबविण्यात आली हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. जोगेंद्र गायकवाड, प्रा. डॉ. पंडित शेंडगे, प्रा.डॉ. संतोष शिंदे ,श्री सचिन चौरे व विविध सहकारी बंधूंचे सहकार्य लाभले.



# पंच परिवर्तनाच्या माध्यमातून उचित परिवर्तन व्हावं– श्री जयंत रानडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ नोव्हेंबर**

दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित, विद्यार्थी विकास मंडळ स्वा. सावरकर महाविद्यालय बीड मार्फत यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण व सु–बोध व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या याप्रसंगी पर्यावरण संरक्षण प्रशिक्षणाचे उद्घाटन सांगली येथील स्थापत्य अभियंता, तथा सदस्य पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन गतीविधी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भा. शि. प्र. संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, स्वा. शैक्षणिक संकुल बीडचे स्थानिक कार्यवाह डॉ.अविनाश देशपांडे, केंद्रीय सदस्य तथा उपाध्यक्ष विद्यासभा श्री उमेश जगताप, श्री प्रमोद कुलकर्णी, सदस्य श्री मधुकर वैद्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे व उपप्राचार्य डॉ उत्तम साळवे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांनी केले आपल्या प्रास्ताविकात त्यांनी पंचप्राणा बद्दल माहिती सांगितली. ते म्हणाले समरसता, नागरिक कर्तव्य, स्वदेशी कुटुंब प्रबोधन व पर्यावरण हे पाच पंचप्राण आहेत पर्यावरण संरक्षण करणे हे प्रत्येकाचे काम व्हावं लागतं संस्काराचे महत्व त्यांनी पटवून दिले. भाषा हा महत्त्वाचा स्व–बोध चा मुद्दा आहे. भारताचे भविष्य तरुणावर अवलंबून आहे. विज्ञानाची प्रगती भारतातील प्राचीन सिद्धांतामुळे झाली. पंच परिवर्तनामुळे उचित परिवर्तन चिंतन करावं विचाराची दिशा प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच प्रत्येक गोष्ट समजून घेतल्यास पुढचे टप्पे लक्षात येतात ठोस पावलं टाकणे हीच परिवर्तनाची सुरुवात आहे. कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी आपल्या मनोगतात म्हणाले



आहे. या पंचप्राणावर सर्वांनी अधोरेखित करावे असे आव्हान त्यांनी केले. सु–बोध या विषयावरील व्याख्यानात बोलताना श्री जयंत रानडे म्हणाले स्व म्हणजे मी तसेच आम्ही कोण आहोत या विषयी पंच परिवर्तनातील समरसता नागरिक कर्तव्य, पर्यावरण, स्व–बोध हा केंद्रीय स्थानी असला पाहिजे. त्यांनी स्वामी विवेकानंदाचे विचार व अनेक उदाहरणे देऊन सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले मनुष्य हा एकमेव जीव आहे मनुष्य व्हावे. हिंदूंना हजारो वर्षाचा इतिहास आहे तसेच स्वबोध हा पंच परिवर्तनातील केंद्रबिंदू आहे. रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचे विचार असणारे हिंदू तेजा जागरे या पुस्तकाची त्यांनी माहिती सांगितली. यानंतर अध्यक्ष समारोप भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र अलुरकर यांनी केला ते म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शंभर वर्ष पूर्ण केले आहे. शक्तीच्या जोरावर परिवर्तनाची दिशा ठरवावी. तसेच स्वबोध विषयावर निसर्गाचा विकास करायचा असेल तर पंच प्राणातील पर्यावरण हा विषय घेऊन प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणासाठी सतर्क असणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रूपाली कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास स्वा. सावरकर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका बालिका देशमुख सावरकर शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# ज्योतिराम कुरणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक पक्षाच्या बीड जिल्हा सचिव पदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरातील समाजसेवक तथा युवा कार्यकर्ते ज्योतिराम बाळासाहेब कुरणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक जिल्हा सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनिलजी तटकरे साहेब यांच्या सुचने प्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सचिव अंबाजोगाई पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित (दादा) पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातुन पक्ष संघटना मजबुतीने उभी कराल हि अपेक्षा त्यांना नियुक्त करताना पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण, तसेच बळीराम गवते राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष आणि माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीने समाजसेवक ज्योतिराम कुरणे यांची पक्षाच्या बीड जिल्हा युवक जिल्हा सचिव पदी निवड करण्यात आली आहे. ज्योतिराम कुरणे हे आपल्या सामाजिक कार्यातून समाजसेवेचा वसा पुढे नेत आहेत. त्याच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अनेक युवकानीं पक्ष प्रवेश देखील केला. ज्योतिराम कुरणे यांची जिल्हा सचिव म्हणून नियुक्ती व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशामुळे अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ताकत अधिक मजबूत होण्यास साहाय्य होनार आहे. ज्योतिराम कुरणे यांच्या निवडीबद्दल त्यांचे राजकिशोर मोदी, संकेत मोदी मनोज लखेरा, माणिक वडवणकर , बबन पणकोळी, ॲड दयानंद लोंढाळ, अंकुश हेडे, महेश कदम, संतोष काळे, अजिंक्य काळे, सुशील जोशी आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# अंबाजोगाई शहरातील युवकांचा राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

### नगर परिषद निवडणूकिच्या रणधुमाळीत शहरातील विविध परीसरातू अनेक युवकांचा राष्ट्रवादी पक्षात ओढा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरातील बलुत्याचा मळा परिसरातील अनेक युवकांचा अंबाजोगाई शहरातील माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत सोमवार दि १० रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ज्योतिराम कुरणे यांच्या माध्यमातून प्रवेश केलेल्यामध्ये सौदागर कुरणे, चंद्रकांत राऊत, सुभाष बलूतकर, रंगनाथ मुळे, शाकीर पठाण यांचा समावेश आहे.

अंबाजोगाई शहरात मागील अनेक वर्षांपासून राजकिशोर मोदी हे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहरवासीयांची सेवा करत आहेत. गेली चाळीस वर्षांपासून अंबाजोगाई शहराचा विकास करून संपूर्ण शहरात राजकिशोर मोदी यांनी आपली पकड मजबुत केली आहे. ज्योतिराम कुरणे हे प्रभागातील विविध सामाजिक उपक्रमांतुन समाजसेवा करत आहे. त्यामुळे त्यांचा संपर्क देखील मोठया प्रमाणात आढळून येतो आहे.




गेली अनेक वर्षे केलेल्या कामाची शिदोरी म्हणूनच शहरातील लहान थोरांपर्यंतच्या मनामनामध्ये राजकिशोर मोदी हे घर करून आहेत. त्यामुळेच आजही अंबाजोगाई शहरातील अनेक युवक राजकिशोर मोदी यांच्यावर विश्वास ठेवत यांच्याकडे आकर्षिले जात आहेत. सध्या नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून प्रत्येक पक्ष आपापल्या पक्षाची विचारधारा मतदारांपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याच प्रयत्नाच्या बळावर शहरातील विविध परिसरातील युवक तथा जेष्ठ व महिला देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेकडे आकर्षिल्या जात आहेत.

# नांदेड मनपाची आरक्षण सोडत; ४१ जागा महिलांसाठी राखीव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ नोव्हेंबर-**

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात आली. २० प्रभागातील ८१ वार्डपैकी ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.



डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात मनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम व उपायुक्त अजितपालसिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रभागाचे प्रभारी अधिकारी नितीन गाढवे यांनी आरक्षणाचा सर्व मसुदा उपस्थितांसमोर ठेवला. २०११ च्या लोकसंख्येनुसार नांदेडची लोकसंख्या ५ लाख ५० हजार ४३९ एवढी आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागात ८१ उमेदवार निवडून द्यायचे असून, त्यातील ४१ महिला आहेत. भाग क्र.२० मधून पाच उमेदवार तर उर्वरित १९ प्रभागातून ४ उमेदवार निवडून द्यायचे आहेत.

प्रभागनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे. प्रभाग क्र.१-अ- अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.२-अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.३-अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.४-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब-अनुसूचित जमाती महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.५-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.६-अ- अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.७-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.८-अ- अनुसूचित जाती पुरुष, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.९-अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१०-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.११-अ-नागरिकांचा मागास प्रवर्ग, ब-सर्वसाधारण महिला, क आणि ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१२-अ-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, ब आणि क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१३-अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क आणि ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१४-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१५-अ-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, ब आणि क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१६-अ-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, ब आणि क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१७-अ-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ब-सर्वसाधारण महिला, क आणि ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१८-अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, क-सर्वसाधारण महिला, ड-सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्र.१९-अ-अनुसूचित जाती पुरुष, ब-अनुसूचित जमाती पुरुष, क-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ड-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र.२०-जो पाच उमेदवारांचा आहे. त्यात अ-अनुसूचित जाती महिला, ब-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, क-नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष, ड-सर्वसाधारण महिला, ई-सर्वसाधारण पुरुष. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले. मात्र इतर मागास प्रवर्गाला देण्यात येणाऱ्या जागांबाबत अन्याय झाल्याने ०.८७टक्क्याला ० मूल्यांकन न देता ८७ टक्के अपूर्णांकाला पूर्णांक देवून ओबीसीच्या जागा वाढवून देण्याची मागणी यावेळी महानगरप्रमुख प्रकाश मारावार, सचिन पाटील आदींनी केली

## रेती माफियाविरुद्ध ग्रामिण पोलीसांची कारवाई;४८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड**-गोदावरी नदीपात्रात रेती उपसा करुन वाहतूक करणाऱ्या रेती माफियांविरुध्द ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत ४८ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एकूण दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विष्णूपुरी प्रकल्पाजवळ गोदावरी नदीपात्रातून रेती उपसा व वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विजयकुमार कांबळे व त्यांच्या पथकाने छापा मारुन दोन लाख ५० हजार रुपयांचे पाच तराफे, सहा लाख रुपये किंमतीचे दोन इंजिन जाळून नष्ट केले. तर एमएच-२६-बीइ-३१३२ हायवा वाहन रेतीने भरलेले आढळून आले. हि कारवाई करताना दोन जणांनी पाण्यात उडी मारुन पलायन केले. या प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी विनोद अण्णाराव ढवळे व हायवा मालक अविनाश देशमुख यांच्याविरुध्द ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## अवैधरित्या जनावराची वाहतूक करणाऱ्या विरोधात अर्धापूर पोलिसांनी कारवाई



**नांदेड** -अवैधरित्या जनावराची वाहतूक करणाऱ्या विरोधात अर्धापूर पोलिसांनी कारवाई करत ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर सूर्यवंशी व पथक पार्डी परिसरात गस्त घालत असताना कंटेनर क्रमांक के.ए.०१-एएम-८५३६ मध्ये जनावरे वाहतूक करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी हा कंटेनर ताब्यात घेतला त्यात ५२ रेडे आढळून आले. पोलिसांनी या कारवाईत ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, हरियाणा राज्यातील बिंचोदय येथील इशरत इसाक, उत्तर प्रदेशातील घोसियान येथील सुफीयाना जान मोहंमद व हरियाणा राज्यातील घंगमोहल्ला येथील हन्नी जान मोहंमद यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## सोनखेड पोलिसांकडून दोघांवर स्थान बद्धतेची कारवाई



**सोनखेड** -पोलिसांनी रेती व मटका चालविणाऱ्या विरुद्ध एम.पी. डी.ए कायद्यानुसार ८ नोव्हेंबर रोजी दोघांवर कार्यवाही करून स्थानबद्ध करण्यात आली आहे. सोनखेड पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत येणाऱ्या अनिल बुद्रुक रा.पांगरी अवैद्य रेतीची वाहतूक करणे आणि महादू नरंगले मटका चालविणे हा रा.शेवडी (बा.) ता.लोहा या दोघांवर हर्सूल मध्यवर्ती कारागृह छत्रपती संभाजी नगर येथे स्थानबद्ध करण्यात आली असल्याची माहिती सोनखेड पोलिस ठाण्याचे सपोनि पांडुरंग माने यांनी दिली. एम पी.डी.ए.कायद्या अंतर्गत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या धोकादायक व्यक्तीच्या विघातक हालचालीवर प्रतिबंध घालण्याच्या महाराष्ट्र प्रतिबंध नजर कैद या कायद्याअंतर्गत एखाद्या व्यक्तीवर दोन व त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल करून सुद्धा तो सातत्याने गुन्हेगारी करीत असेल व त्या प्रवृत्तीपासून समाजात सार्वजनिक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तर अशा प्रवृत्तीच्या आरोपीचा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी त्या गुन्ह्याचा अहवाल पोलीस अधीक्षक यांच्याकडे दाखल करावा आणि त्यानंतर तो जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावा तो प्राप्त अहवाल आल्यानंतर त्या गुन्हेगाराची हकीकत जाणून घेऊन तो प्रस्ताव जिल्हा न्याय दंडाधिकारी हे मंजूर करतील त्यानंतर सदरील आरोपीला एका वर्षासाठी कारागृहात नजर कैदेत/ स्थानबद्ध ठेवण्यात येईल त्या आरोपीला आपल्या जमिनीसाठीचा अर्ज हा केवळ उच्च न्यायालयामध्येच दाखल करता येईल अशी प्रस्तावना या एम.पी डी.ए.कायद्याची आहे. या कार्यवाही मुळे रेती माफियाचे धाबे दणाणले असून जिल्ह्यात हि पहिलीच कार्यवाही असल्याचे बोलले जात आहे त्यामुळे अजुन किती जण सोनखेड पोलिसांच्या रडारवर आहेत हे येणाऱ्या काळात पाहावे लागणार आहे

# नगराध्यक्ष व नगरसेवक उमेदवारीसाठी तीव्र गर्दी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १० नोव्हेंबर-**

मुदखेड नगरपरिषद निवडणूकीचे वातावरण सध्या तापले असून इच्छूकांमध्ये कोणाला टिकीट मिळणार याकडे सर्व मतदाराचे लक्ष लागले आहे.

भाजपाकडून नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची मुलाखत पार पडली. आणि नुकतीच काँग्रेस पक्षाकडून सुध्दा इच्छूक उमेदवारांची मुलाखती घेण्यात आल्या आहेत. यामध्ये काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार म्हणून एकाच नावाची चर्चा खूप झाली होती. पण त्या चर्चेमध्ये आता नवीन




इच्छुक उमेदवार आल्याने जनतेमध्ये वेगळाच सुर ऐकायला मिळत आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक टिकटासाठी असलेली गर्दी खरोखरच तीव्र आहे. भारतीय जनता पार्टीने फक्त एका उमेदवाराला टिकट दिल्यामुळे बाकीचे सगळे निराश होणार हे स्पष्टच आहे. पक्षाच्या आंतरिक प्रक्रियेत अनेकदा एक तिकीट, अनेक दावेदार असा समीकरण असतो, त्यामुळे इच्छूकांमध्ये उत्सुकता आणि निराशा दोन्ही वाढते. पक्षाच्या पक्षश्रेष्टीच्या सहमतीने, सर्व इच्छूक उमेदवारांच्या कार्याचा आढावा घेतल्यानंतरच एका नामांकनावर सहमती बनते, ज्यामुळे बाकीचे दावेदार बाहेर पडतात. जेव्हा एका उमेदवाराला टिकीट मिळते, तेव्हा त्याच्या समर्थकांमध्ये उत्साह असतो, पण टिकट न मिळालेल्यांच्या समर्थकांमध्ये निराशा आणि कधीकधी विरोधही दिसून येतो. त्यामुळे पक्षाचे पक्षश्रेष्ठी कोणाला तिकीट देतील आणि यामध्ये कोणाच्या पदरात निराशा पडेल याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे.

# गोदावरी अर्बनचा 'सहकारिता कुंभ २०२५' मध्ये विशेष सन्मान




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ नोव्हेंबर-**

नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटी (छऋऊणइ) यांच्या वतीने विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य सहकारिता कुंभ-२०२५ या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक या संस्थेच्या कार्याचा विशेष सन्मान करण्यात आला. या अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी कर्नाटकाचे कायदे मंत्री एच.के.पाटील, तसेच सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ.अशिष कुमार भूटानी, छऋऊणइ चे अध्यक्ष श्री लक्ष्मीकांत दास, छणउऋऊ चे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, आणि छऋऊणइ चे उपाध्यक्ष श्री मिलिंद काळे यांची उपस्थिती होती. या राष्ट्रीय अधिवेशनाच्या चर्चासत्रात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सहकारी संस्थांची अर्थव्यवस्थेतील भूमिका अधोरेखित करत, मल्टीस्टेट आणि पतसंस्थांसाठी स्वतंत्र छत्र संस्था (णालीशश्रश्रर जीसरपळरींळेप) स्थापन करण्याची व ठेवीदारांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय संरक्षण निधी निर्माण करण्याची मागणी केली.

या दोन दिवसीय अधिवेशनाचा विषय होता - डिजिटायजिंग ड्रीम्स - सशक्त समुदाय या निमित्ताने देशभरातील अग्रगण्य सहकारी संस्था, बँका आणि क्रेडिट सोसायट्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये गोदावरी अर्बन या संस्थेने गेल्या ११ वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासाची आणि प्रगतीच्या आलेखाची प्रभावी चित्रफीत सादर केली. सहकार मूल्यांवर आधारित पारदर्शक कार्यपद्धती, ग्राहक केंद्रित सेवा, डिजिटल व्यवहारांचे आधुनिकीकरण आणि सामाजिक जबाबदारी या सर्व अंगांनी गोदावरी अर्बनने निर्माण केलेले उदाहरण सर्वांनी गौरवले. या अधिवेशनात गोदावरी अर्बनच्या कार्याचा विशेष उल्लेख करत संस्थेच्या सहकारातील नाविन्यपूर्ण दृष्टीकोनाचे कौतुक करण्यात आले. सहकार क्षेत्रातील डिजिटल परिवर्तन, आर्थिक समावेशन आणि ग्रामीण व शहरी संतुलन साधण्यात गोदावरी अर्बनने केलेल्या भरीव योगदानाची दखल घेण्यात आली.

गोदावरी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांच्या नेतृत्वाखाली व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या नियोजनात ही संस्था आज राज्यातील तसेच राष्ट्रीय सहकार क्षेत्रात आदर्श ठरत आहे. सहकारिता कुंभातील या विशेष सन्मानामुळे गोदावरी अर्बनचा विश्वास, प्रगती आणि सहकार हा संदेश संपूर्ण देशभर झळकला आहे.या आधिवेशनात गोदावरी अर्बनने सक्रिय सहभाग घेतल्यामुळे संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील व अध्यक्ष राजश्री पाटील यांचे अभिनंदन केले.

यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष हेमलता देसले, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव रविंद्र रगटे, संचालक प्रा.सुरेश कटकमवार, वर्षा देशमुख, अजय देशमुख, नैसनन्स प्रमुख सुमलता राव, उपसर व्यवस्थापक विजय शिरमेवार, रवी इंगळे विपणन अधिकारी महेश केंद्रे, व्यवस्थापक प्रशांत कदम, डेप्युटी मॅनेजर संदीप बोरगेमवार, अनिकेत मोहदरे, रुपाली नेरुळकर, राजकौर, महानंदा कदम, हरीष इंदूरकर उपस्थित होते.

# करडखेड सर्कलमध्ये अर्जुन गायकवाड यांनी जिल्हा परिषद रणशिंग फुंकले

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ११ नोव्हेंबर-**

तालुक्यातील करडखेड सर्कलमधून जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात अर्जुन गायकवाड यांनी आपल्या प्रचार मोहिमेची दमदार सुरुवात केली आहे. मिर्जापुर येथे नारळ फोडून जनतेच्या गाठीभेटी मोहिमेला प्रारंभ करत गायकवाड यांनी पिंपळगाव, नागराळ, भक्तापूर, करडखेड, काठेवाडी, भक्तापूर, कुशावाडी, बल्लूर आदी गावांना भेट देत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.



यावेळी गायकवाड म्हणाले, जनतेच्या विश्वासावर आणि पाठिंब्यावरच आम्ही आगामी निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. विकासाच्या नव्या अध्यायाची सुरुवात करण्यासाठी मी जिल्हा परिषद निवडणुकीचा निर्धार केला आहे. मागील दोन दशकांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले अर्जुन गायकवाड हे जहांगीर टाकळी ग्रामपंचायतीचे दीर्घकाळ नेतृत्व करत आले आहेत. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामे पूर्ण झाली असून, ग्रामविकास आणि समाजसेवेच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे.

गावोगावी सुरू असलेल्या त्यांच्या भेटीगाठी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून स्थानिक पातळीवर गायकवाड यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत अर्जुन गायकवाड आणि त्यांच्या मित्रपरिवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात प्रवेश केले आहे. राष्ट्रवादी पक्षाकडून ते निवडणूक लढवणार हे असल्याचे पक्षी श्रेष्ठींना सांगितले आहे. सध्या गायकवाड हे उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धेत आघाडीवर आहेत. त्यांनाच उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी जनतेकडून व्यक्त केली जात आहे. अर्जुन गायकवाड यांचा सामाजिक कार्याचा आणि लोकसंपर्काचा प्रवास आता राजकारणाच्या पुढील टप्प्यात महत्त्वाचा ठरणार आहे, अशी चर्चा जनतेत रंगत आहे.

## लिपिक टंकलेखक पदासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ नोव्हेंबर-**

सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील सरळसेवेने लिपिक टंकलेखक गट क ही पदे भरण्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने ५ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. परंतू जास्तीत जास्त उमेदवारांना अर्ज भरण्याची संधी मिळण्यासाठी अर्ज भरण्यास बुधवार २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नांदेड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# भोकरच्या पूरवठा विभागाचा सावळा गोंधळ

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १० नोव्हेंबर-**

तहसील कार्यालयातील पूरवठा विभागाचा अनागोंदी कारभार सूरु असून याकडे संबधितांचे साफ दूर्लक्ष दिसून येते.

भोकर तालूक्यातील पूरवठा विभागात दूय्यम शिधापत्रीका तसेच विभक्त शिधापत्रीका करण्यासाठी अव्वाच्या सव्वा रक्कम लाभार्थ्याकडून घेत असल्याचे समजते.तसेच डिबिटी लिंक द्वारे वर्षभरापासून शेतकरी लाभार्थ्यांना पैसे मिळाले नसून शिधापत्रीका लाभार्थीकडून डाटा ईन्ट्रीच्या नावाखाली हजारो रुपये उकळत असल्याचे बोलल्या जात आहे.एपिएल शिधापत्रीकाधारकांचे नाव प्राधान्य कूटूंबात वर्ग करुन देण्यासाठी देखील हजारो रुपये घेत असल्याची चर्चा असुन याकडे संबधित विभागाचे अक्षम्य दूर्लक्ष होत आहे.रेशन दूकान चालकांना गोदामातून धान्य पोहचतो सदरील गोदामातून पोत्यामध्ये धान्य कमी येत असल्याच्या तक्रारी अनेक रेशन दूकान चालकांचे आहेत सदरील पूरवठा विभागात शासकिय कर्मचाऱ्यावर वरिष्ठांचे नियंत्रण नसल्यामूळे या विभागात अनागोंदी कारभार पहावयास मिळतो ग्रामीण भागातील अनेक लाभार्थी शासनाच्या स्वस्त धान्यापासून वंचित आहेत.तूमचे धान्य चालू करतो म्हणून लूट होत असल्याच्या प्रतिक्रिया लाभार्थ्याकडून उमटत आहेत.संबधित अधिकारी पूरवठा विभागाकडे लक्ष देवून कारभारामध्ये सूधारणा करण्यात यावी अशी मागणी तालूक्यातील शिधापत्रीकाधारक करित आहेत.

## प्रा. अनिल शिंदे आचार्य पदवीने सन्मानित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ नोव्हेंबर-**

श्री दत्त महाविद्यालय, हदगाव येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक अनिल चितांबर शिंदे यांना दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मार्फत वनस्पतीशास्त्र (बॉटनी) या विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवीने सन्मानित करण्यात आले.

# देविदास वाघमारे यांच्या 'शिळ्या भाकरी' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. ११ नोव्हेंबर-**

'शिळ्या भाकरी' हा काव्यसंग्रह शिक्षणाचे महत्व सांगणारा आणि विद्रोहाची जाणीव करुन देणारा काव्यसंग्रह आहे. आधुनिक काळात हा काव्यसंग्रह सर्वसामान्य लोकांना प्रेरणा आणि उर्जा देईल, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक तथा समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथम शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून श्री शिवाजी विद्यामंदिर, कंधार येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक देविदास वाघमारे यांच्या 'शिळ्या भाकरी' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा शुक्रवारी, दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता सिध्दार्थनगर, कंधार येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते प्रमुख भाष्यकार म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे व कार्यक्रमाचे उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त प्राचार्य माधव जाधव हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी कॉलेजचे मराठी विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.दिलीप सावंत, ग्रामीण कवी नागोराव डोंगरे, कवयित्री रुपाली वैद्य-वागरे, कवयित्री ज्योती परांजपे, प्रसिद्ध कवी प्रा.ज्ञानेश्वर गायकवाड यांची उपस्थिती होती.

# क्षितिज जाधव यांच्या निवेदनाची दखल; मनपाच्या पथकाने केला दिप नगर ते तरोडा नाका रस्ता मोकळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ नोव्हेंबर-**

शहरातील दिपनगर ते तरोडा नाका मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी बसणाऱ्या भाजीपाला विक्रेत्यांना रस्त्याच्या बाजूला करावे अन्यथा आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा भारतीय जनता पार्टीचे माजी सरचिटणीस क्षितिज जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांना दिला होता. या निवेदनाची तात्काळ दखल घेत मनपाच्या पथकाने आज सकाळी या मार्गावर रसत्याच्या मधोमध बसलेल्या भाजीपाला विक्रेत्यांना बाजुला केले.



शहरातील दिपनगर ते तरोडा नाका मार्गावर भाजीपाला विक्रेते तसेच हातगाडी चालकांनी कब्जा केलेला आहे. मागील काही दिवसापासून भाजीपाला विक्रेते व हातगाडी चालकांनी थेट रस्त्याच्या मधोमध ठाण मांडल्याने वाहतुकीला मोठा अडथळा होत असून वाहतुकीची कोंडी हे नित्यनेमाचे झाले आहे . भाजीपाला विक्रेते रस्त्याच्या मधोमध बसत असल्यामुळे याचा त्रास पादचारी नागरिकांना होत आहे. विशेष करून शालेय विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे. रस्ता अरुंद त्यातच भाजीपाला विक्रेते रस्त्याच्या मध्यभागी येत असल्याने या मार्गावरून जाण्यासाठी स्कूलबस चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. भाजीपाला विक्रेत्यांच्या या रस्त्यावरील अतिक्रमामुळे दीपनगरसह परिसरातील जनता वैतागली असून या मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी बसणाऱ्या भाजीपाला विक्रेत्यांना रस्त्यावर न बसण्याची ताकीद द्यावी अन्यथा आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा क्षितिज जाधव यांच्यासह परिसरातील नामदेव केंद्रे, मुकुंद धानोरकर, गौतम सारपाते, साईनाथ तेलंग, विलास देवळे, विशाल धुतमल, माधव खंडागळे, दीपक तेलंग, संतोष गवळी, सोनू नेरलकर यांनी दिला होता. या दखल घेत मनपाच्या पथकाने आज सकाळी या मार्गावर रसत्याच्या मधोमध बसलेल्या भाजीपाला विक्रेत्यांना बाजुला केले. तसेच पुन्हा रस्त्यावर ठाण मांडुन बसल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला.

दरम्यान मनपा पथकाने भाजीपाला विक्रेत्यांना रस्त्याच्या बाजुला केले याबाबत आभार व्यक्त करत मनापाने या कारवाईमध्ये सातत्य ठेवावे पुन्हा भाजीपाला विक्रेते रस्त्यावर येणार नाहीत याची दक्षता घेण्याची मागणी क्षितिज जाधव यांनी केली आहे.